| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ८१ वा | शुक्रवार, दिनांक १२ जून २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26


Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)   कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## १९५० नंतरचा सर्वात भीषण 'एल निनो' सक्रिय!

# मान्सूनसाठी धोक्याची घंटा; भारतावर दुष्काळाचे सावट ?

**मुंबई /वृत्तसंस्था :** प्रशांत महासागरात एल निनो सक्रिय झाल्याची घोषणा सीपीसी अर्थात क्लायमेट प्रेडीक्शन सेंटरने केली आहे. यंदा १९५० नंतरचा सर्वाधिक तीव्र 'एल निनो' राहण्याचा अंदाज देखील वर्तवण्यात आला आहे. एल निनो डिसेंबरमध्ये अति तीव्र होऊ शकतो असा अंदाज देखील आहे. २०२७ च्या पूर्वार्धातही 'एल निनो' सक्रिय असेल असा कयास बांधला जात आहे. प्रशांत महासागरातील न्यूट्रल स्थिती जाऊन एल निनो निर्माण झाल्याची घोषणा अमेरिकी हवामानशास्त्र संस्था नोआच्या क्लायमेट प्रेडिक्शन (सीपीसी) सेंटरने गुरुवारी केली. डिसेंबरपर्यंत एल निनोची (El Nino Update) तीव्रता अतितीव्र स्वरूपाची होणार असून, यंदाचा एल निनो १९५० पासूनच्या नोंदींमधील सर्वाधिक तीव्र ठरण्याची शक्यता सीपीसीने वर्तवली आहे. सीपीसीने गुरुवारी जारी केलेल्या अंदाजानुसार, गेल्या महिनाभरात एल निनोची (El Nino Update) स्थिती विकसित झाल्याचे निष्पन्न झाले आहे. यंदाचा एल निनो फेब्रुवारी २०२७ मध्येही सक्रिय राहण्याची शक्यता ९० टक्क्यांहून जास्त असल्याचे सीपीसीच्या अंदाजात म्हटले आहे.



**२०२७ च्या पूर्वार्धातही एलनेनो सक्रिय असेल**

प्रशांत महासागरात एलनिनो सक्रिय झाल्याची घोषणा करण्यात आली आहे. सीपीसी अर्थात क्लायमेट प्रेडिक्शन सेंटरनं ही घोषणा केली

आहे. यंदा १९५० नंतरचा सर्वाधिक तीव्र असा एल निनो राहण्याचा अंदाज वर्तवला जातोय. एल निनो डिसेंबरमध्ये अति तीव्र होऊ शकतो असाही अंदाज असेल, २०२७ च्या पूर्वार्धातही एलनेनो सक्रिय असेल असा कयास बांधला जातोय आणि अर्थातच या एल निनोचा मोठा परिणाम हा मान्सूनवर होतोय आणि त्यामुळे महाराष्ट्राला देखील त्याचा फटका बसू शकतो, सरासरी पेक्षा यंदा कमी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आलेला आहे,एल निनोचा प्रभाव वाढतोय, त्याची वाटचाल सुरू झालेली आहे कसे परिणाम होऊ शकतात,एल निनोचे खास करून मान्सूनवर, या प्रश्नावरती माहिती देताना हवामान अभ्यासक मयुरेश प्रभुणे यांनी सांगितलं की, सीपीसीने अधिकृतपणे सांगितलं आपण आधीपासूनच म्हणत होतो की एमनो जून मध्ये सक्रिय होणार पण आता आता गेल्या महिन्याभरातला प्रशांत महासागराच तापमान पाहून सीपीसीने कालच जाहीर केले की, एल निनो सक्रिय झालेला आहे. याची तीव्रता उत्तरोत्तर वाढत जाणार आहे आणि ते डिसेंबर पर्यंत सर्वाधिक राहण्याची शक्यता आहे, अशी माहिती त्यांनी दिली आहे.

**मॉन्सूनच्या प्रगतीमध्ये हा अडथळा निर्माण होतोय**

आधीच पाऊस लांबलेला आहे आणि त्यामुळे त्याचं कारण देखील एल निनो हेच आहे का? यावर उत्तर देताना प्रभुणे म्हणाले की, याचा एक प्रकारे इनडायरेक्टली कारण ते असू शकत, कारण पाऊस पुढे सरकण्यासाठी किंवा सक्रिय होण्यासाठी मेडन जुलियन ऑसिलेशन म्हणजे एमजेओ हा घटक महत्त्वाचा असतो हे ढगांच क्षेत्र असत विषवृत्ताला धरून ते पूर्वेकडे सरकत असतं आणि हे एमजीओ बराच काळ म्हणजे बरेच आठवडेत भारतीय उपखंडावर आलेलच नाही म्हणजे हिंदी महासागरावर आलेल नाहीय आणि ते प्रशांत महासागरावरच सक्रिय आहे, तर एलनिनो विकसित होत असताना एमजीओ त्याच भागावर बराच काळ राहणे हे एक आपणत्याच्यामधील कनेक्शन धरू शकतो. आता हे क्षेत्र जून अखेरीस जुलैच्या सुरुवातीला भारतीय उपखंडावर येऊ शकते, असाअंदाजांमध्ये वर्तवण्यात आलेले आहे आणि दुसऱ्या बाजूला या आखादी देशांकडून पण कोरडे वारे आपल्या वातावरणामध्ये येत तर त्यांनी सुद्धा मॉन्सूनची वाटचाल रोखून धरलेली आहे तर त्यामुळेच की मॉन्सूनच्या प्रगतीमध्ये हा अडथळा निर्माण होत आहे. आता त्याच्या मागचे कारण जे आहे त्याच्यामध्ये एलिनिनोची महत्त्वाची भूमिका असू शकते, हे आता या ज्यावेळेस जाहीर झाले की एलिनो सक्रिय झाला त्याच्यावरून हे स्पष्ट होते अशी माहिती त्यांनी यावेळी दिली आहे.

# अफकॉन्सच्या सीएसआर उपक्रमामुळे ९४ कर्करोगग्रस्त बालक व पालकांच्या जीवनात नवी उमेद- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई/प्रतिनिधी: अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने सामाजिक उत्तरदायित्वातून (सीएसआर) बालरुग्णांसाठी कर्करोग निदान सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. त्यामुळे ९४ बालकांच्या आणि त्यांच्या पालकांच्या जीवनात नवी उमेद जागविण्याचे प्रेरणादायी काम झाले आहे,अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या सुविधेचे कौतुक केले आहे.**

अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने २०२५-२६ मध्ये शिक्षण, आरोग्य सेवा आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रांमध्ये सीएसआरच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले आहेत. त्यामध्ये शिक्षण क्षेत्राला विशेष प्राधान्य असले तरी आरोग्य क्षेत्रातही महत्वाचे काम केले आहे. देशभरातील कर्करोगाचा संशय असलेल्या बालरुग्णांसाठी तातडीची निदान सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या उपक्रमाअंतर्गत अफकॉन्सने टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या माध्यमातून कर्करोगाचा संशयित आजार असलेल्या बालरुग्णांसाठी आपत्कालीन निदान सहाय्य सेवा या योजनेसाठी ५० लाख रुपयांची आर्थिक मदत केली आहे. या सहाय्यामुळे देशभरातील ९४ बालकांना कर्करोगाचे तातडीने निदान आणि आवश्यक वैद्यकीय तपासण्या उपलब्ध होऊ शकल्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कर्करोगासारख्या गंभीर आजारामध्ये वेळेवर निदान होणे अत्यंत महत्त्वाचे असते. आर्थिक अडचणींमुळे अनेक कुटुंबांना आवश्यक तपासण्या करता येत नाहीत. अशा परिस्थितीत अफकॉन्सने दिलेली मदत केवळ आर्थिक सहाय्य नसून अनेक बालकांच्या उपचार प्रक्रियेला गती देणारी आणि त्यांच्या कुटुंबांना दिलासा देणारी ठरली आहे. शासनाच्या प्रयत्नांना उद्योग क्षेत्राची अशी साथ मिळाल्यास आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक विकासाची उद्दिष्टे अधिक वेगाने साध्य होऊ शकतात. म्हणूनच समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील भागीदारी अधिक बळकट होणे आवश्यक आहे.

कॉर्पोरेट क्षेत्राच्या सामाजिक बांधिलकीचे हे एक उत्कृष्ट उदाहरण ठरत असल्याचे नमूद करुन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अफकॉन्सने शिक्षण क्षेत्राबरोबरच महिला सक्षमीकरण आणि आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये केलेली गुंतवणूक ही शाश्वत विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. समाजातील गरजू घटकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी अशा सीएसआर उपक्रमांची भूमिका अत्यंत मोलाची ठरते.

## बससेवा सुरु करण्याची मागणी

**अहमदपूर/प्रतिनिधी:** : तालुक्यातील लांजी-तांबट सांगवी-विळेगाव-मानखेड- सोनखेड, केंद्रेवाडी या मार्गावर बस सुरू करावी, अशी मागणी उद्धव सेनेचे तालुका संघटक अनिकेत फुलारी यांनी येथील आगार व्यवस्थापकांकडे निवेदनाद्वारे केली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना एस.टी. बसमुळे मोठा आधार मिळत आहे. या मार्गावरील बस बंद करण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांबरोबर प्रवाशी, व्यापाऱ्यांची अडचण होत आहे. परिणामी, खाजगी वाहनाचा आधार घ्यावा लागत आहे. आगार प्रमुखांनी याकडे लक्ष देण्याची मागणी केली आहे.

## शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी नवीन लिंक कार्यान्वित; 'स्वाधार' योजनेसाठीही वसतिगृहाचा अर्ज भरणे अनिवार्य

**लातूर/प्रतिनिधी:** जिल्ह्यातील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत चालविल्या जाणाऱ्या शासकीय वसतिगृहांची सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. यासाठी आता जुन्या वेबपोर्टलमध्ये बदल करण्यात आला असून, नवीन वेबपोर्टलवर ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन समाज कल्याण विभागाकडून करण्यात आले आहे. लातूर जिल्ह्यामध्ये मुलांची १४ व मुलींची १२ अशी एकूण २६ शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. यामध्ये लातूर शहरात मुलांचे ६ तर मुलींचे ४, औसा, निलंगा, उदगीर, देवणी, आणि चाकूर येथे प्रत्येकी मुला-मुलींचे १, अहमदपूर येथे प्रत्येकी २, रेणापूर येथे मुलांचे १ आणि जळकोट येथे मुलींचे १ वसतिगृह आहे. इयत्ता ८ वी, ११ वी, बिगर व्यावसायिक पदवी/पदविका (प्रथम वर्ष), पदव्युत्तर (प्रथम वर्ष) आणि थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेणारे विद्यार्थी (व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून) या प्रवेश प्रक्रियेसाठी पात्र आहेत. पात्र विद्यार्थ्यांनी https://hmasnew.mahait.org या नवीन ऑनलाईन लिंकचा वापर करून आपले अर्ज सादर करावेत. शालेय विद्यार्थ्यांसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ३० जून २०२६ असून कनिष्ठ महाविद्यालय व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी मुदत १५ जुलै २०२६ पर्यंत आहे. शासकीय वसतिगृहासाठी अर्ज करणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील पात्र विद्यार्थ्यांना, जागांअभावी वसतिगृहात प्रवेश न मिळाल्यास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ ऑनलाईन पद्धतीने दिला जाणार आहे. वसतिगृह प्रवेशासाठी निवड न झालेल्या विद्यार्थ्यांचेच अर्ज स्वाधार योजनेसाठी ऑनलाईन पद्धतीने वर्ग होणार आहेत. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशाचा ऑनलाईन अर्ज भरलेला नाही, अशा विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेसाठी स्वतंत्र अर्ज सादर करण्याची कोणतीही सुविधा उपलब्ध असणार नाही व त्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. तरी विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी शासनाने दिलेल्या नवीन वेब लिंकचा वापर करून विहित मुदतीत ऑनलाईन अर्ज भरावेत. तसेच, कोणतीही अडचण आल्यास स्थानिक गृहप्रमुख किंवा गृहपाल यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन लातूरचे समाज कल्याण सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

# भीषण अपघातात दीड वर्षाच्या निष्पाप बाळासह दोघांचा मृत्यू

**किनगाव/प्रतिनिधी:** वाहन चालवताना सुरक्षिततेचे नियम पाळणे किती गरजेचे आहे, याचा एक अत्यंत भीषण आणि डोळे उघडवणारा प्रत्यय चाकुर तालुक्यातील जढाळा गावाजवळ आला आहे. एका कार अपघातात चालकाने सीट बेल्ट न वापरल्यामुळे त्याला आपला जीव गमवावा लागला, तर धक्कादायक बाब म्हणजे या अपघातात एका दीड वर्षाच्या निष्पाप चिमुरड्याचाही मृत्यू झाला आहे. दुसरीकडे, चालकाच्या बाजूला बसलेल्या प्रवाशाने सीट बेल्ट लावल्यामुळे त्याचा जीव थोडक्यात वाचला आहे. हा अपघात २५ मे रोजी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास झाला. एम. एच. १५ जे.एक्स. १५२८ या क्रमांकाची अर्टिगा गाडी धानोरा पाटीकडून बेलगावच्या दिशेने जात होती. जढाळा गावाजवळ आल्यावर चालक महादेव पांडुरंग नरहरे (वय २० वर्षे, रा. वरवंटी, ता. व जि. लातूर) याने कार वेगाने चालवून रस्त्याच्या मधोमधा असलेल्या डिव्हायडरला जोराची धडक दिली. पोलिसांनी



दिलेली ची धक्कादायक माहिती दिली की, अपघातानंतर कारची एअरबॅग ओपन (खुल्या) झाली होती. परंतु, चालक महादेव याने सीट बेल्ट न वापरता तो पाठीमागून खोचून ठेवला होता. एअरबॅग उघडूनही सीट बेल्ट नसल्यामुळे चालकाचा जीव वाचू शकला नाही. यावरून वाहन चालवताना सीट बेल्ट लावणे किती अनिवार्य आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

**हसते-खेळते कुटुंब अपघाताच्या खाईत, दीड वर्षाच्या बाळाचा मृत्यू**

चालकाच्या बाजूच्या सीटवर बसलेले सहप्रवाशी विशाल व्यंकटराव मिरकले यांनी सीट बेल्ट लावलेला असल्यामुळे ते या भीषण अपघातात केवळ किरकोळ जखमी झाले आणि त्यांचा जीव वाचला. मात्र, चालकाच्या निष्काळजीपणामुळे विशाल मिरकले, त्यांच्या पत्नी मेघा विशाल मिरकले हे गंभीर जखमी झाले. तर, त्यांचा अवघ्या दीड वर्षाचा लहान मुलगा इरेश विशाल मिरकले (रा. हटक्याळ, ता. कंधार, जि. नांदेड) याचा या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. चालकाच्या हलगर्जीपणामुळे तो स्वतःच्या आणि निष्पाप बाळाच्या मरणास कारणीभूत ठरला. या प्रकरणी फिर्यादी विशाल व्यंकटराव मिरकले यांच्या तक्रारीवरून किनगाव पोलीस ठाण्यात ११ जून (वार गुरुवार) रोजी रात्री गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस अधिकारी सोनवणे करत आहेत.

## प्रभात किरणे

स्वार्थ साधता गमवती हक्काची माणसं
ऐसे करता करता रिकामा होई गोतवळा
मग जगे जगी एकटा,अपकीर्ती,ठरे खोटा
उरतो न जिव्हाळा,तयाचे जीवन उन्हाळा

-इंजि. नागनाथ कलवले

लातूर ९७६४७ ८८२८८

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**इथेनॉल मिश्रित पेट्रोलला केंद्रीय उत्पादन शुल्कातून सूट............**

## चिमटा दयाचा

**शहरात अस्वच्छता वाढल्याने डासाचे प्रमाण वाढले! डेंग्यु-मलेरियाचे रूग्णाची भीतीही वाढली!!**

# सोनसाखळी चोरीचा अवघ्या काही तासांत छडा

# महिला चोरट्यास गांधी चौक पोलिसांनी केली अटक

**लातूर/प्रतिनिधी:** प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेत मध्यवर्ती बसस्थानक परिसरात महिलांच्या दागिन्यांवर डल्ला मारणाऱ्या एका सराईत महिला चोरट्यास गांधी चौक पोलिसांनी अवघ्या काही तासांत जेरबंद करत चोरीस गेलेले ७० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने हस्तगत केले आहेत. तांत्रिक विश्लेषण, गोपनीय माहिती आणि पोलिसांच्या तत्पर तपासामुळे हा गुन्हा उघडकीस आला असून एका महिलेने यापूर्वी केलेल्या आणखी एका चोरीची कबुलीही दिली आहे.

दि. ९ जून २०२६ रोजी रात्री सुमारे मध्यवर्ती बसस्थानक, लातूर येथे ही घटना घडली होती. फिर्यादी ह्या आपल्या आईला पुणे येथे जाणाऱ्या बसमध्ये बसविण्यासाठी बसस्थानकात आल्या होत्या. आईला बसमध्ये बसवून खाली उतरत असताना त्यांच्या आईने सुरक्षिततेसाठी त्यांच्याकडे दिलेले सुमारे १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने लंपास केले.

या प्रकरणी गांधी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४०३/२०२६,



कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी तातडीने गुन्ह्याचा छडा लावण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण व उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड यांचे नेतृत्वात तपास पथकाची नियुक्ती केली.

तपासादरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरील उपलब्ध माहिती, तांत्रिक विश्लेषण, संशयितांची पडताळणी तसेच आलेल्या माहितीनुसार पोलिसांनी सापळा रचून अर्चना (वय २६ वर्षे, रा. गावठाण माही, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर) हिला ताब्यात घेतले.

सखोल चौकशीदरम्यान महिलेने बसस्थानक परिसरात फिर्यादीचे सोन्याचे दागिने चोरी केल्याची कबुली दिली. तिच्याकडून चोरीस गेलेले १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले.

याचबरोबर आरोपीकडे अधिक तपास केला असता तिने गांधी चौक पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक ४२/२०२६, कलम ३०३(२) बीएनएस मधील चोरीचा गुन्हाही केल्याचे कबूल केले आहे. त्यामुळे तिच्याकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असून गांधी चौक पोलीस पुढील तपास करत आहेत.

ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, यांचे सूचनेवरून अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण आणि उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुनील रेजीतवाड, यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस उपनिरीक्षक प्रमोद देशमुख, फौजदार कांदे ,राजेंद्र टेकाळे, राम गवारे, संतोष गिरी, रविसन जाधव, सचिन चंद्रपाटले, शिवा भाडुळे, पद्माकर सुरवसे, महादेव फुले, सचिन जाधव, युनूस शेख, महिला पोलीस अंमलदार अनुराधा डोंगरे, सुमन कोरे यांनी पार पाडली.

## सरकारी कामात अडथळा; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**अहमदपूर/प्रतिनिधी:** : लातूरहून अहमदपूरकडे प्रवाशांना घेऊन येणाऱ्या एसटी बस चालकास अडवून मारहाण केल्याची घटना ९ जून रोजी अहमदपुरात घडली आहे. याप्रकरणी अहमदपूर पोलिस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, फिर्यादी बजरंग जायभाये (रा. येस्तार) हे अहमदपूर बस आगारात चालक म्हणून कार्यरत आहेत. ९ जून रोजी सायंकाळी ते एमएच २० बीएल ३१०१ क्रमांची बस घेऊन वाहक कल्पना बनसोडे यांच्यासह लातूरहून अहमदपूरकडे येत होते.

बस भागीरथी लॉज समोरील रस्त्यावर आली असता, समोरून एक दुचाकीस्वार रस्त्याच्या मधोमध मोटारसायकल चालवत होता. बसचालकाने हॉर्न वाजवूनही दुचाकीस्वार गाडी बाजूला घेत नव्हता. अखेर बसचालकाने बाजूने गाडी पुढे नेली. त्याचा राग आल्याने मोहसीन मणियार (रा. अरफत कॉलनी, अहमदपूर) याने आपली दुचाकी बसच्या समोर आडवी लावून बस थांबवली. त्यानंतर त्याने आपल्या इतर तीन साथीदारांना बोलावून बसचालकाला मारहाण केली.

सरकारी कामकाजात अडथळा निर्माण केला. या प्रकरणी बजरंग जायभाये यांच्या फिर्यादीवरून अहमदपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक स्मिता जाधव करत आहेत.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## पंतप्रधानांना तसा दिर्घ अनुभव

आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजकारणात प्रचंड काळ घालविला व घालवित आहेत. एवढा दिर्घकाळ यशस्वीपने पार पाडणे आवघड आहे. तरी त्यांनी पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याकाळखंडापेक्षा आघाडी घेतली. देशाच्या जडण-घडीत अनेकांनी हात भार लावला आहे. आपआपल्यापरिने काम केले आहे. सर्वोकृष्ठ काम लालबहादुर शास्त्री यांनी केले. त्याला तोड नाही. त्यांचा प्रत्येक गुण इतरांनी घ्यावा असा आहे. त्यांचे जीवन प्रत्येक राजकारणींच्या जीवनात उतरावे असेच आहे. असे जरी असले तरी गुण कोणीही घेत नाहीत. त्यामुळे चालू विचार केला पाहिजे. देशात किती काळ सेवा केली यापेक्षाही किती जनतेसाठी काम केले याचे मुल्यमापन होते असते. देशात दोन मोठ्या चुका म्हणा किंवा दुर्दैव म्हणा देशाचे! पहिले पंतप्रधान होण्यात लोहपुरूष सरदार वल्लभभाई यांना महात्मा गांधीजींनी रोखले व दुसरे दिर्घ काळ लालबहादुर शास्त्री यांना पंतप्रधानपदी राहाता आले नाही. या दोन बाबी घडल्या नसत्यातर देश महासत्ता बनला असता दुसरे 'सोने की चिडीया' म्हणून ओळख कायम राहीली असती. भारतीयांचे दुर्दैव असे होवू शकले नाही. देशात सर्वाधिक काळा हा कॉँग्रेसच्या ताब्यात होता. यावेळी काही चुका झाल्या त्या आजही भोगाव्या लागत आहेत. दुसरे असे की, सर्वजनच धर्मनिरपेक्ष असा शब्द प्रयोग करतात. याचा अर्थ समजुन घेतला पाहिजे. देशात एकाला एक कायदा व दुसऱ्याला दुसरा अमल कशासाठी? एकाला एक पत्नी व दुसऱ्याला बहुपत्नी हा फरक देशातील जनतेला कळून येत नाही का? एकीकडे सर्वसमान, सर्वधर्मसमभाव म्हणायाचे तर दुसरीकडे असे दिसून येते का? या बाबीचा विचार केला तर वेड लागल्याशिवाय राहात नाही. देश स्वतंत्र झाल्यापासून भारत कोणत्या बाबतीत स्वयंपुर्ण झाला, यावर चिंतन होणे अपेक्षित आहे. विज्ञानयुगात इंटरनेटसेवा फास्ट असली पाहिजे. बँकेत जावा किंवा पोष्टात जावा नेट स्लो म्हणून ग्राहकांना हाकलून दिले जाते ही वस्तूस्थिती आहे. इंधनाला पर्याय शोधला नाही. ग्रामीण भागातील रस्ते व्यवस्थिती नाहीत तीच ओरड शहरी भागात आहे. पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटला नाही. उन्हाळ्यात वाडी-तांड्यावरून कोसोदूरवरून पाणी आणावे लागते. ग्रामीण भागातील शाळाची आवस्था बिकट आहे तर मग विकासा कोणाचा झाला? असा विचार समोर येतो. मुळात आर्थिक नाडी ठराविका धनदांडग्याच्या हाती आहे. दुसऱ्या देशात शिक्षण व आरोग्य मोफत आहे आपल्या देशात यावरच मोठ्या प्रमाणात खर्च होतो. याखर्चासाठी अनेकजन भ्रष्टाचार करतात हे नजरेआड करून चालणार नाही. त्यामुळे सर्वाधिक काळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भुषविला आहे व आगामी काळात यशस्वीपने धुरा सांभाळणार आहेत यात शंका नाही. आगामी काळात तेच पंतप्रधानपदी विराजमान होतील यात शंका नाही. आता तर लोकसभेच्या जागा वाढविण्याचा विचार चालू आहे. यात काय साध्य होणार आहे. सध्याला आहेत त्यात सुधारणा अपेक्षित आहे. प्रत्येक मतदार संघाचा आढावा घेणे अपेक्षित आहे. सर्व मतदार संघात सारख्याच समस्या आहेत असे नाही. विविध मतदार संघात विविध समस्या आहेत. त्यामुळे त्या सोडविल्या पाहिजेत. पंतप्रधान हे पद सर्वोच्च आहे. मोठी जबाबदारी आहे. देश सुरक्षित ठेवण्याबरोबर समस्या सोडविण्याचे काम सतत झाले पाहिजे. ज्या चुका पुर्वी घडल्या त्यात सुधारणा अपेक्षित आहेत. दोन बाबी लक्षात घेतल्या पाहिजेत. एक सर्व काही कायद्याने होईलच असे नाही. काही वेळा धाडसी जनतेसाठी निर्णयाची गरज आहे. देश सुरक्षित राहाण्यासाठी वाटेल ती किंमत मोजावी लागली तरी चालेल,यात कुचराई काही कामाची नाही. सर्वात मोठे उदा. प.बंगाल निवडणुकीचे आहे. भाजपाला सत्ता या ठिकाणी मिळाली कारण तेथे देशविरोधी काम होत होते. जनतेच्या हाती काही बाबी नाहीत असे समजू नये, जनतेच्या भावना ओळखून काम केले पाहिजे. पंतप्रधानपदाचा दिर्घ काळ उपभोगत असताना काही धाडसी निर्णयाची गरज आहे. देशाच्या सीमा सुरक्षित नाहीत. देशांतर्गत देशविरोधी काम होत आहे. अशासाठी बाहेरच्या देशातून आर्थिक मदत मिळते आहे. ती कोणत्याही परिस्थितीत रोखली पाहिजे. पंतप्रधान म्हणून अनेक अधिकार आहेत. त्याचा वापर राष्ट्रासाठी प्राधान्याने करणे अपेक्षित आहे. देशांतर्गत काही राज्यात काही विपरीत काम होत असेल तर त्याकडे लक्ष ठेवून त्याचा बिमोड केला पाहिजे. भारत संरक्षणाबाबत सक्षम, स्वयंपूर्ण कसला पाहिजे. यासाठी निधीमोठ्या प्रमाणात राखीव ठेवलाच पाहिजे. देशात विरोधीपक्षाची स्थिती खराब आहे ती जनतेनी केली आहे. याला जबाबदार विरोधीपक्षतील काही जन आहेत. जनतेनी त्यांची जागा दाखविली आहे. याचा अर्थ सत्ताधाऱ्याने लक्षपुर्वक कामे केली पाहिजे. आता समस्शस सोडविण्यासाठीच कार्यक्रम तयार करून तो वेळेत राबविला पाहिजे. समस्यातर अनेक आहेत. काही मोठया तर काही मर्यादित आहेत. अशा स्थितीत कोणत्या कामाला प्राधान्य दिले पाहिजे. लोकसभेत रालोआचे जवळपास चारशेवर सदस्य संख्याबळ आहे. त्यामुळे आता घाबरण्याचे कारण नाही. आता जोमाने काम करून भारत महासत्ताधिश बनला पाहिजे. भारतीय जनतेचा मोठा पाठींबा आहे. अशा स्थितीत जनतेसाठी काय केले पाहिजे, याचाच विचार केला पाहिजे. बारा वर्ष पंतप्रधानपदी राहाणे हा मोठा अनुभव आहे. संपुर्ण माहिती मिळालेली असते. त्यानुसार आगामी काळात देशातील जनतेसाठी काय करता येईल याचा विचार केला पाहिजे. बारा वर्षात पंतप्रधानावर मोठा विश्वास ठेवून अनेक राज्य भाजपाप्रणीत झाली तर विरोधकांना मोठी हार पत्कारावी लागत आहे. वरचेवर विरोधकांचे खच्चीकरण होत आहे तरी त्याची परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न होत नाहीत. त्यामुळे जनतेचा मोठा विश्वास सत्ताधारी पक्षाने सार्थ केला आहे. यापुढेही अधिक दृढ होण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

# संत रोहिदास महामंडळाच्या कर्ज योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :** संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळामार्फत मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी २०२६-२०२७ या वर्षात '५० टक्के अनुदान योजना'(९ लाभार्थी) आणि 'बीज भांडवल योजना' (११ लाभार्थी) राबविण्यात येत आहे. कर्ज या योजनेच्या लाभासाठी इच्छुक लाभार्थींनी महामंडळाच्या जिल्हा कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

कर्ज प्रस्तावासोबत अर्जदाराने जोडावयाची कागदपत्रे :-

१) जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रहिवाशी दाखला, रेशनकार्ड, आधार कार्ड, मतदान कार्ड.

२) शैक्षणिक दाखला, तीन फोटो कॉपीज, पॅन कार्ड, लाभार्थाचा उद्योग आधार प्रमाणपत्र

३) ज्या ठिकाणी व्यावसाय करावयाचा असेल त्या जागेचा पुरावा (जागेचे लाईटबील, टॅक्स/भाडे पावती/भाडे करारनामा/जागा वापर संमती पत्र किंवा मालकी हक्काचा पुरावा इ.)

४) कागदपत्र खरी असल्याबाबत लाभार्थ्यांचा विनंती अर्ज व ज्या जागी व्यावसाय चालू आहे त्याच जागेचे प्रमाणित केलेले छायाचित्र.

५) ग्रामपंचायत, नगरपालिका अथवा महानगरपालिका यांचे ना हरकत प्रमाणपत्र

६) व्यावसायासबंधी तांत्रिक प्रमाणपत्र तसेच अनुभवाचा दाखला

७) आवश्यकतेनुसार प्रकल्प अहवाल, सनदी लेखापालच्या सही व शिक्क्यासह

८) खरेदी करावयाच्या मालमत्तेच्या साहित्याचे जी.एस.टी. क्रमांक असलेले दरपत्रक (कोटेशन).

९) अर्जदाराचे वारसदाराच्या स्वाक्षरीसह नामांकन शपथपत्र (रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर)

१०) अर्जदाराचे तसेच जामिनदारांचे विहीत नमुन्यातील शपथपत्र (रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर)

११) लाभार्थाचा आधारकार्ड क्रमांक तसेच आधार संलग्न बैंक खाते क्रंमाक

१२) दोन सक्षम जामिनदार (नोकरदार किंवा मालमत्ताधारक/शेतकरी)

१३) सक्षम दोन जामिनदार अ २ शासकीय जामिनदारांच्या कार्यालयाचे हमीपत्र अथवा ब २ शेतकरी /मालमत्ताधारक यांचे सात बारा/नमुना क्र. आठच्या उता-यावर सक्षम अधिका-याची सही व शिक्यानुसारची उतारे सोबत सह. दुय्यम निबंधक अथवा गर्व्हमेंट व्हल्युवर यांचे सबंधित मालमत्तेचे मुल्यांकन पत्र अथवा प्रमाणपत्र आवश्यक.

अर्जदार हा चर्मकार समाजातील (चांभार, मोची, ढोर, होलार आदी) असावा. यापूर्वी त्याने महामंडळाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा. इच्छुक लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्जाच्या तीन प्रती कार्यालयीन वेळेत जिल्हा कार्यालय, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई शहर, गव्हर्नमेंट लेदर वर्किंग स्कूल कंपाऊंड, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०००५१ येथे स्वतः उपस्थित राहून मूळ कागदपत्रांच्या पडताळणीसह कर्ज प्रस्ताव दाखल करावेत. या योजनांचा लाभ घेऊन समाजबांधवांनी आपली सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रगती साधावी, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई उपनगर यांनी केले आहे.

# चाकूर शहरात स्वच्छता कंत्राटदाराचा कामगारांच्या जीवाशी खेळ

**चाकूर/प्रतिनिधी:** नगर पंचायत क्षेत्रातील स्वच्छता व्यवस्थेसाठी दरमहा लाखो रुपयांचे कंत्राट दिले जात असताना प्रत्यक्षात स्वच्छता कामगारांच्या सुरक्षिततेकडे मात्र पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र समोर आले असून महिन्याला सुमारे ११ लाख २१ हजार रुपयांचे देयके उचलणाऱ्या कंत्राटदाराकडून कामगारांना आवश्यक सुरक्षा साहित्य उपलब्ध करून दिले जात नसल्याने त्यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे.

चाकूर शहरात स्वच्छता कामगार दररोज नाल्यांमधील साचलेला गाळ, कुजलेला कचरा आणि घाण पाण्यात उतरून साफसफाईची कामे करतात. मात्र, त्यांच्या हातात हातमोजे, पायात गमबूट,चेहऱ्यावर मास्क आणि शरीर संरक्षणासाठी आवश्यक पोशाख नसल्यामुळे कामगार थेट हातानेच कचरा विलगीकरण करीत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. नगर पंचायतच्या वतीने ९ महिन्यासाठी १ कोटी ९१ हजार रुपयाची स्वच्छता निविदा प्रक्रिया पूर्ण करीत असताना संबंधित कंत्राटदाराला मे महिन्यात पत्र देवून पावसाळ्यापूर्वी शहरातील विविध भागात नाले सफाई करीत असताना सर्व मजुर कामगारांना सुरक्षा उपकरणे देण्यात यावे. त्यामध्ये हॅन्ड ग्लोज,मास्क, गमबूट देवूनच कामाला लावण्यात यावे असे पत्र दिले आहे. त्यानंतर मजूर कामगारांचा विमा कवच काढण्यात यावे असे असतानाही याबाबीचे कंत्राटदाराकडून पालन होत नसल्याने कामगारांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.

शहरातील घाण पाणी, दुर्गंधी आणि संसर्गजन्य वातावरणात सातत्याने काम केल्यामुळे कामगारांना त्वचारोग, श्वसनविकार तसेच विविध संसर्गजन्य आजारांचा धोका वाढत आहे. अशा परिस्थितीत कामगारांच्या आरोग्याची जबाबदारी नेमकी कोण घेणार, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

# बालपणाला मुक्त श्वास देऊ या

दि. १२ जून हा दिवस जगभरात 'बालमजुरीविरोधी जागतिक दिन' म्हणून साजरा केला जातो. बालपण हे प्रत्येक मुलाच्या आयुष्यातील सर्वात निरागस, आनंददायी आणि घडणारा काळ असतो. या काळात मुलांच्या हातात पुस्तके, खेळणी आणि स्वप्नांची रंगीत दुनिया असायला हवी; परंतु वास्तव मात्र यापेक्षा खूप वेगळे आहे. जगातील कोट्यवधी मुले आजही गरिबी, सामाजिक विषमता, अशिक्षितपणा आणि विविध प्रतिकूल परिस्थितींमुळे शिक्षणापासून वंचित राहून मजुरी करण्यास भाग पडत आहेत. त्यांच्या कोवळ्या हातात पेनऐवजी विटा, कचऱ्याच्या पिशव्या, चहाचे ग्लास किंवा कारखान्यातील धोकादायक साधने दिली जात आहेत. ही परिस्थिती केवळ त्या मुलांच्या भविष्यावरच परिणाम करणारी नाही, तर संपूर्ण समाजाच्या विकासालाही अडथळा निर्माण करणारी आहे. म्हणूनच बालमजुरीविरोधी जागतिक दिनाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.

बालमजुरी ही केवळ आर्थिक समस्या नसून ती सामाजिक, नैतिक, शैक्षणिक आणि मानवी हक्कांशी संबंधित गंभीर समस्या आहे. जेव्हा एखाद्या मुलाला त्याच्या वयानुसार शिक्षण, खेळ, आरोग्य आणि सुरक्षित वातावरणापासून वंचित ठेवून उपजीविकेसाठी काम करण्यास भाग पाडले जाते, तेव्हा ती बालमजुरी ठरते. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या व्याख्येनुसार अशी कोणतीही कामे जी मुलांच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक किंवा नैतिक विकासासाठी घातक ठरतात आणि त्यांच्या शिक्षणात अडथळा निर्माण करतात, ती बालमजुरी मानली जातात. बालमजुरीमुळे मुलांचे बालपण हिरावले जाते, त्यांचे शिक्षण अर्धवट राहते आणि त्यांचे आयुष्य गरिबीच्या दुष्टचक्रात अडकून पडते.

बालमजुरीचा इतिहास मानवजातीच्या औद्योगिक विकासाशी निगडित आहे. औद्योगिक क्रांतीच्या काळात कारखान्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर बालकामगारांचा वापर केला जात असे. कमी वेतनात, जास्त वेळ आणि कोणतीही सुरक्षा नसताना मुलांकडून काम करून घेतले जात असे. कालांतराने समाजसुधारक, मानवाधिकार संघटना आणि विविध देशांच्या सरकारांनी बालमजुरीविरोधात आवाज उठवला. कामाच्या ठिकाणी मुलांचे होणारे शोषण रोखण्यासाठी विविध कायदे करण्यात आले. या चळवळीचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे २००२ साली आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने १२ जून हा दिवस 'बालमजुरीविरोधी जागतिक दिन' म्हणून घोषित केला. या दिवसाचे उद्दिष्ट बालमजुरीविषयी जनजागृती करणे, बालकामगारांच्या समस्यांकडे जगाचे लक्ष वेधणे आणि बालमजुरी निर्मूलनासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यास प्रोत्साहन देणे हे आहे.

जगभरातील बालमजुरीचे स्वरूप विविध प्रकारचे आहे. काही मुले शेतीच्या कामात गुंतलेली असतात, तर काही कारखाने, हॉटेल्स, चहाच्या टपऱ्या, बांधकाम क्षेत्र, खाणी, घरगुती कामे, कचरा वेचणे किंवा रस्त्यावरील विक्री यांसारख्या क्षेत्रांत काम करतात. काही ठिकाणी मुलांना सक्तीची मजुरी करावी लागते, तर काही मुलांना मानवी तस्करीद्वारे कामासाठी विकले जाते. विशेषतः धोकादायक उद्योगांमध्ये काम करणाऱ्या मुलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. रसायनांचा संपर्क, धूळ, आवाज, अवजड यंत्रसामग्री आणि अपुरी सुरक्षा यामुळे त्यांना विविध आजारांना सामोरे जावे लागते. अनेकदा अपघातांमुळे त्यांचे कायमस्वरूपी अपंगत्वही येते.

बालमजुरीची कारणे अनेकांगी आहेत. गरिबी हे त्यामधील प्रमुख कारण मानले जाते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांमध्ये मुलांच्या कमाईला कुटुंबाच्या उत्पन्नाचा एक भाग म्हणून पाहिले जाते. शिक्षणाचा खर्च, बेरोजगारी, कर्जबाजारीपणा आणि अपुरी सामाजिक सुरक्षा यामुळे पालक मुलांना कामावर पाठवतात. अशिक्षित पालकांना शिक्षणाचे महत्त्व समजत नाही आणि तात्पुरत्या आर्थिक गरजांपुढे मुलांच्या भवितव्याकडे दुर्लक्ष होते. काही भागांत सामाजिक रूढी, लिंगभेद आणि पारंपरिक व्यवसायांची सक्ती यांमुळेही बालमजुरी वाढीस लागते. मुलींना घरगुती कामे किंवा घरकामासाठी इतरांकडे पाठविण्याच्या घटनाही मोठ्या प्रमाणात आढळून येतात.

शिक्षणाचा अभाव आणि बालमजुरी यांचे घनिष्ठ नाते आहे. जी मुले शाळेबाहेर राहतात, त्यांना बालमजुरीच्या विळख्यात अडकण्याची शक्यता अधिक असते. दुसरीकडे, जेव्हा मुले काम करू लागतात, तेव्हा त्यांचे शिक्षण खंडित होते. अशा प्रकारे गरिबी, अशिक्षण आणि बालमजुरी यांचे दुष्टचक्र तयार होते. या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी सर्वसमावेशक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण अत्यंत आवश्यक आहे. शाळांमध्ये आकर्षक वातावरण, मोफत शैक्षणिक सुविधा, पौष्टिक आहार योजना आणि पालकांमध्ये जागृती निर्माण केल्यास बालमजुरीचे प्रमाण कमी होऊ शकते.

भारतात बालमजुरी ही चिंतेची बाब राहिली आहे. देशाने आर्थिक प्रगती केली असली, तरी अनेक सामाजिक आणि आर्थिक विषमतांमुळे बालमजुरी पूर्णतः नष्ट झालेली नाही. ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांमध्ये बालकामगार आढळून येतात. काही मुले शेतीत काम करतात, तर काही लहान उद्योग, हॉटेल्स, वर्कशॉप्स, विटभट्ट्या आणि घरगुती उद्योगांमध्ये गुंतलेली असतात. शहरांमध्ये स्थलांतरित कुटुंबांतील मुलांवर बालमजुरीचे संकट अधिक तीव्रतेने दिसून येते. कोविड-१९ महामारीनंतर अनेक कुटुंबांच्या आर्थिक स्थितीवर विपरीत परिणाम झाल्याने काही भागांत बालमजुरीचे प्रमाण वाढल्याची भीती व्यक्त करण्यात आली होती.

भारतीय राज्यघटनेने बालकांच्या संरक्षणासाठी विविध तरतुदी केल्या आहेत. राज्यघटनेच्या कलम २४ नुसार चौदा वर्षांखालील मुलांना कारखाने, खाणी किंवा इतर धोकादायक उद्योगांमध्ये कामावर ठेवण्यास बंदी घालण्यात आली आहे. कलम २१-अ नुसार सहा ते चौदा वर्षे वयोगटातील मुलांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार देण्यात आला आहे. राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांमधील कलम ३९ मध्ये मुलांच्या आरोग्याचे आणि विकासाचे संरक्षण करण्यावर भर देण्यात आला आहे. या घटनात्मक तरतुदी बालहक्कांच्या संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण ठरतात.

भारतात बालमजुरी प्रतिबंधासाठी विविध कायदे अस्तित्वात आहेत. बालमजुरी (प्रतिबंध आणि नियमन) अधिनियम १९८६ आणि त्यामधील २०१६ मधील सुधारणा महत्त्वपूर्ण आहेत. या कायद्यानुसार चौदा वर्षांखालील मुलांना कोणत्याही व्यवसायात रोजगार देण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच चौदा ते अठरा वर्षे वयोगटातील किशोरांना धोकादायक उद्योगांमध्ये काम करण्यास मनाई करण्यात आली आहे. शिक्षणाचा हक्क कायदा, किशोर न्याय कायदा आणि मानवी तस्करीविरोधी तरतुदी देखील बालमजुरीविरोधातील लढ्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. तथापि, केवळ कायदे पुरेसे नसून त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

बालमजुरीचा मुलांच्या शारीरिक आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. वाढत्या वयात अति श्रम केल्यामुळे त्यांच्या शरीराची योग्य वाढ होत नाही. कुपोषण, अशक्तपणा, श्वसनविकार, त्वचारोग आणि दृष्टीदोष यांसारख्या समस्या उद्भवतात. धोकादायक उद्योगांमध्ये काम करणाऱ्या मुलांना रसायनांच्या संपर्कामुळे दीर्घकालीन आजार होऊ शकतात. अपुऱ्या विश्रांतीमुळे आणि अस्वच्छ वातावरणामुळे त्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते.

बालमजुरीचे मानसिक परिणामही तितकेच गंभीर असतात. बालपणात सतत कामाचा ताण, मारहाण, अपमान आणि शोषण यांचा सामना करणाऱ्या मुलांमध्ये नैराश्य, भीती, आत्मविश्वासाचा अभाव आणि सामाजिक अलिप्तता निर्माण होऊ शकते. काही मुलांना भावनिक आधार मिळत नसल्याने त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास खुंटतो. बालमजुरीमुळे त्यांच्यातील सर्जनशीलता, जिज्ञासा आणि स्वप्न पाहण्याची क्षमता कमी होत जाते.

बालमजुरी ही मुलांच्या मूलभूत मानवी हक्कांचे उल्लंघन आहे. प्रत्येक मुलाला शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता, संरक्षण आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. बालहक्कांसंदर्भातील संयुक्त राष्ट्रसंघाच्या करारामध्ये मुलांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात आला आहे. बालमजुरी या हक्कांना बाधा आणते आणि मुलांना त्यांच्या क्षमतांचा पूर्ण विकास करण्यापासून रोखते. त्यामुळे बालमजुरीविरोधातील लढा हा मानवी प्रतिष्ठेच्या संरक्षणासाठी आवश्यक आहे.

बालमजुरी निर्मूलनासाठी सरकार, स्वयंसेवी संस्था, उद्योगक्षेत्र, शैक्षणिक संस्था आणि सामान्य नागरिक यांचे संयुक्त प्रयत्न आवश्यक आहेत. सरकारने गरिबी निर्मूलनाच्या योजना प्रभावीपणे राबविणे, गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे आणि कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. स्वयंसेवी संस्था बालकामगारांची ओळख पटविणे, त्यांचे पुनर्वसन करणे आणि समाजामध्ये जागृती निर्माण करणे यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. उद्योगक्षेत्राने पुरवठा साखळीमध्ये बालकामगारांचा वापर होणार नाही याची खात्री करणे आवश्यक आहे.

पालकांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य देणे, अल्पकालीन आर्थिक फायद्यापेक्षा त्यांच्या उज्ज्वल भविष्याचा विचार करणे आणि मुलांवरील कामाचा बोजा कमी करणे आवश्यक आहे. समाजानेही बालकामगारांकडे केवळ सहानुभूतीने न पाहता त्यांच्या समस्येच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न करायला हवा. घरगुती मदतनीस म्हणून किंवा लहान उद्योगांमध्ये बालकामगारांचा वापर टाळणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

माध्यमांची भूमिकाही महत्त्वपूर्ण ठरते. वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ आणि सामाजिक माध्यमांच्या साहाय्याने बालमजुरीच्या समस्येकडे समाजाचे लक्ष वेधले जाऊ शकते. बालकामगारांच्या वास्तवाचे चित्रण करून जनजागृती केली जाऊ शकते. तसेच यशस्वी पुनर्वसनाच्या कथा समाजासमोर आणल्यास सकारात्मक बदल घडवून आणण्यास मदत होऊ शकते.

शिक्षण हा बालमजुरीविरोधातील सर्वात प्रभावी उपाय मानला जातो. प्रत्येक मुलाला दर्जेदार, सर्वसमावेशक आणि आनंददायी शिक्षण मिळाल्यास बालमजुरीचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटू शकते. शाळा सोडलेल्या मुलांना पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष उपक्रम राबविणे आवश्यक आहे.



कौशल्य विकास, समुपदेशन आणि आर्थिक सहाय्याच्या माध्यमातून बालकामगारांचे पुनर्वसन केले जाऊ शकते.

बालमजुरीविरोधी जागतिक दिन आपल्याला केवळ समस्या दाखवून देत नाही, तर उपाययोजनांची दिशाही दाखवतो. या दिवसानिमित्त आयोजित केले जाणारे जनजागृती कार्यक्रम, चर्चासत्रे, शालेय उपक्रम आणि मोहिमा समाजामध्ये सकारात्मक बदल घडविण्यास मदत करतात. मुलांचे बालपण सुरक्षित ठेवण्यासाठी सामूहिक बांधिलकी निर्माण करणे हे या दिवसाचे खरे उद्दिष्ट आहे.

आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात मानवाने अभूतपूर्व प्रगती केली आहे; परंतु जर समाजातील एकही मूल शिक्षणापासून वंचित राहून मजुरी करण्यास भाग पडत असेल, तर आपल्या विकासाच्या संकल्पना अपूर्ण ठरतात. मुलांच्या हातात कामाची साधने नव्हे तर ज्ञानाची साधने असली पाहिजेत. त्यांना भयमुक्त, शोषणमुक्त आणि आनंदी बालपण मिळणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

बालमजुरी निर्मूलन हा केवळ सरकारचा कार्यक्रम नसून तो सामाजिक चळवळ बनला पाहिजे. प्रत्येकाने आपल्या स्तरावर जागरूक राहून बालमजुरीच्या घटनांची माहिती संबंधित यंत्रणांना द्यावी. बालकामगारांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सहकार्य करावे. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन बालपणाचे संरक्षण करण्यासाठी पुढाकार घेतल्यासच बालमजुरीमुक्त समाजाची निर्मिती शक्य होईल.


दि. १२ जूनचा हा दिवस आपल्याला एक महत्त्वपूर्ण संदेश देतो की मुलांचे स्थान शाळेत आहे, कामाच्या ठिकाणी नाही. त्यांच्या चेहऱ्यावरचे हसू, डोळ्यांतील स्वप्ने आणि भविष्याबद्दलची आशा जपणे हीच खरी मानवता आहे. प्रत्येक मूल हे राष्ट्राची अमूल्य संपत्ती आहे. त्यांना सुरक्षित, सन्मानपूर्वक आणि संधींनी समृद्ध जीवन देणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. बालमजुरीविरोधातील संघर्ष हा मुलांच्या अधिकारांसाठी, सामाजिक न्यायासाठी आणि अधिक संवेदनशील जगाच्या निर्मितीसाठीचा संघर्ष आहे. चला, या जागतिक दिनानिमित्त आपण सर्वजण अशी प्रतिज्ञा करूया की कोणत्याही मुलाचे बालपण मजुरीच्या ओझ्याखाली दबले जाणार नाही. प्रत्येक मुलाला शिक्षण, संरक्षण, प्रेम आणि स्वप्न पाहण्याचे स्वातंत्र्य मिळेल. कारण बालपण वाचविणे म्हणजेच भविष्य वाचविणे होय.

-डॉ. राजेंद्र बगाटे

# दोन तृतीयांशकडे

**छोटे-मोठे प्रादेशिक पक्ष भाजपने एकतर आपल्या पंखाखाली घेतले आहेत किंवा संपवले आहेत. काँग्रेस, समाजवादी पक्ष यांची त्यांना चिंता नाही. देशभर निरंकुश सत्ता निर्माण करण्याच्या दिशेने भाजप जात आहे.**

राज्यसभेच्या येत्या निवडणुकीसाठी मध्य प्रदेशातून काँग्रेसच्या मीनाक्षी नटराजन यांचा उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकार्यांनी 'तांत्रिक' कारणाने फेटाळला आहे. या राज्यातून आमदारांच्या संख्याबळाच्या आधारे भाजपला दोन व काँग्रेसला एक जागा मिळणे अपेक्षित होते. मात्र भाजपने तिसरा उमेदवार रिंगणात उतरवला होता. नटराजन यांच्या विरुद्ध तेलंगणातील न्यायालयात एक खटला दाखल आहे. त्याचा उल्लेख उमेदवारी अर्जात नसल्याच्या कारणाने त्यांचा अर्ज बाद ठरला आहे. साहजिकच भाजपचे तिन्ही उमेदवार विजयी होणार हे उघड आहे. निवडणूक निर्णय अधिकार्यांसमोर भाजपने नटराजन यांच्या अर्जास हरकत घेतल्याचे वृत्त आहे. 'काँग्रेस मधूनच ही माहिती दिली गेली' असा दावा भाजपचे नेते कैलाश विजयवर्गीय यांनी केला. काँग्रेसमधील गटबाजीकडे त्यांचा रोख होता. प्रत्यक्षात भाजपच्या तेलंगणातील नेत्यांनी ही माहिती मध्य प्रदेशातील पक्षाच्या नेत्यांना कळवल्याचे उघड होत आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांत पूर्ण बहुमत मिळवण्याच्या हेतूने भाजपने व्यूह रचना केली आहे. गुजरात मागोमाग मध्य प्रदेशातही राज्यसभेच्या सर्व जागा जिंकणे हा त्याच खेळीचा भाग आहे. संसदेवर पूर्ण पकड मिळवल्यानंतर विरोधकांनी रस्त्यात कितीही निदर्शने केली तरी ती निरर्थक ठरणार आहेत.



फुटीचा फायदा

मध्य प्रदेशात भाजपने तिसरा उमेदवार उतरवल्यानंतर काँग्रेसला संशय का आला नाही? मुळात नटराजन यांचा अर्ज निर्दोष असल्याची काळजी घेणे गरजेचे होते. अर्ज दुरुस्त करण्याची संधी निवडणूक आयोग उमेदवारास देऊ शकते का? हाही प्रश्न महत्त्वाचा आहे. लोकशाही हा संख्येचा खेळ मानला जातो. गेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपला बहुमत न मिळाल्याने 'एनडीए'कडे दोन तृतीयांश बहुमत नाही. संसदेत व विधी मंडळात महिलांना आरक्षण देणारे विधेयक त्यामुळेच संसदेत फेटाळले गेले. त्या विधेयकाला मतदारसंघांच्या फेररचनेचे विधेयकही जोडले आहे. मोदी सरकारसाठी ते जास्त महत्त्वाचे आहे. ही विधेयके फेटाळली गेल्यानंतर लोकसभेत दोन तृतीयांश बहुमत मिळवण्यासाठी भाजपने प्रयत्न सुरू केले. नशिबाचे फासेही त्यांच्या बाजूने पडले. पश्चिम बंगालमध्ये पराभव झाल्यानंतर तृणमूल काँग्रेसमध्ये फूट पडली. लोकसभेत या पक्षाचे २९ खासदार आहेत. त्यापैकी २० जण आपल्या बाजूने असल्याचा दावा ककोली दस्तिदार यांनी केला आहे. हा गट 'एनडीए'च्या वळचणीला जाणार असे दिसते. पक्षांतर बंदी कायद्याच्या कचाट्यातून सुटण्यासाठी ही संख्या पुरेशी आहे. त्यांच्या आधारे 'एनडीए' ३००चा आकडा गाठेल. तामिळनाडूच्या निवडणुकीत काँग्रेस व द्रमुकचे बिनसले आहे. लोकसभेत द्रमुकचे २२ खासदार आहेत. ते कदाचित 'मुद्द्यांवर आधारित'भाजपला पाठिंबा देतील. सत्ता आणि संपत्ती असल्यावर अशांची समजूत घालणे सोपे जाते. हे दोन्ही गट जर बाजूने वळले तर 'एनडीए'ची सदस्य संख्या ३३५ पर्यंत जाते. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे सहा खासदार आपल्यात आणण्याचा एनडीए प्रयत्न करत आहे. छोटे पक्ष, अपक्ष यांचा पाठिंबा मिळवणे आणखी सोपे आहे. महत्त्वाच्या प्रसंगी सत्तेस साथ दिली तर फार मोठा 'लाभ' होतो हे राजकारणी ओळखून असतात. मतदार संघांच्या फेररचनेस आपण कडाडून विरोध केला होता याची जाणीव द्रमुक व तृणमूलचे खासदार ठेवतील का? तत्त्वनिष्ठेसाठी सत्तेला विरोध करणारे राजकीय नेते कधीच लोपले आहेत. सोयीनुसार हात मिळवणी या पातळीवर भारतीय राजकारण घसरले आहे. २०२९ मध्ये 'एक देश एक निवडणूक' या कल्पनेची तसेच मतदारसंघ फेररचनेची अंमलबजावणी करणे हे मोदी-शहा यांचे उद्दिष्ट आहे हे लपून राहिलेले नाही. कारण त्यामुळे भाजपची जवळपास सर्व देशात सत्ता निर्माण होईल. त्यासाठीच लोकसभा व राज्यसभेत दोन तृतीयांश बहुमत निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यामुळे त्यांना अप्रत्यक्ष मदत करणारे विरोधकही संपून जातील आणि विरोधक विहीन

एकाधिकारशाही अस्तित्वात येईल.

---



# समग्र विकास घडवणारे शिक्षण आहे कुठे?

शिक्षण बोध : संदीप वाकचौरे

समर्थ रामदास स्वामी हे आपल्या साहित्यातून मानवी जीवनात अधिक चांगुलपणाच्या वाटा दाखवत आहेत. अर्थात सर्वच संतांनी त्या दिशेने प्रवास घडवला आहे. समर्थ रामदास स्वामी हे शिक्षणाचा मूलभूत अर्थ आणि जीवनाचे तत्त्वज्ञान दासबोधातून सांगू पाहत आहेत. आपण ज्याला आज शिक्षण म्हणतो, ती शिक्षणाची वाट संतांना चार-पाचशे वर्षांपूर्वी देखील अपेक्षित नव्हती. शिक्षणाचा मूळ विचार आणि वर्तमानातील शिक्षण विचार यांचे नाते काही केल्या जुळताना दिसत नाही. अलीकडच्या कालखंडात विद्यार्थ्यांच्या समग्र विकासाची प्रक्रिया शिक्षणातून अपेक्षित केली जात नाही. शाळा-महाविद्यालये आणि अगदी पालकांना देखील समग्र विकास अपेक्षित नाही. शाळा या मागणी तसा पुरवठा करू पाहात आहेत. शिक्षण समाज, राष्ट्र घडवण्याच्या मूळ ध्येयापासून दूर जात शिक्षणाच्या बाजारीकरणासाठी पुढे सरसावत आहेत. पैसे देणार्या पालकांना काय हवे आहे तेच शाळा-महाविद्यालये देत आहेत. त्यामुळे शिक्षणाची दुकानदारी सुरू आहे. जागतिकीकरणानंतर जशी विशेष सुविधांची दुकाने सुरू झाली, तसे शिक्षणात घडू लागले आहे. एका विशिष्ट महाविद्यालयात प्रवेश घेतला म्हणजे आपल्याला हव्या असलेल्या अभ्यासक्रमाचा प्रवेश निश्चित असे मानले जाऊ लागले. एकाच शालेय अभ्यासक्रमातून आपण माणूस घडवू असे सांगणारे कोणी भेटत नाही. विविध जाहिराती पाहिल्या म्हणजे येथे माणूस घडवला जाईल असे चित्र नाही.

स्पर्धा परीक्षेचे बीजारोपण

मुळात शिक्षणतज्ज्ञांनी देखील म्हटले आहे की, शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक, सांस्कृतिक, बौद्धिक अशा विविध स्वरूपाची विकासाची प्रक्रिया शिक्षणातून घडण्याची अपेक्षा आहे. आज या समग्र विकासासाठी खरेच काही घडते आहे का? याचा शोध भिंग लावून घ्यावा लागेल, असे चित्र आहे. अगदी प्राथमिक स्तरापासून आपण मुलांवर केवळ स्पर्धा परीक्षांचे बीजारोपण करत आहोत. या परीक्षांची गरज आहेच; पण त्यापलीकडे आपल्याला शिक्षणातून माणूस घडवायचा आहे हे आपण विसरत तर नाही ना अशी शंका येऊ लागली आहे. स्पर्धा परीक्षांचे बसलेले भूत शिक्षण अधिक दुःखदायक बनवत आहे. क्षमतेचा विचार न करता काहींना काही लादण्यात शिक्षण मरते आहे. मुळात जग, संशोधन, शिक्षणाच्या प्रक्रिया या संदर्भाने जगभरात कितीतरी नव्या पाऊलवाटा चालल्या जात आहेत. अशा परिस्थितीत त्या नव्या वाटा चालताना, त्याचा दृष्टिकोनाचा विचार करणारी व्यवस्था मात्र आपण उभी करण्यात आपण अपयशी ठरतो आहोत. आपण नवसंशोधन समजून घेणे आणि त्यादृष्टीने शिक्षणात विचार करणे घडत नाही. त्यामुळे शिक्षण आनंददायी नाही, तर दुःखदायक ठरते आहे. शिक्षण दुःखदायक असेल, तर आपण आनंदी समाज व समग्र विकासाची माणसे निर्माण करू शकणार नाही. समग्र विकास घडणार नसेल, तर उद्याचे समाजाचे अस्तित्व अधिक निराशाग्रस्त असण्याचा धोका आहे.

बौद्धिक विकासाचाच विचार

वर्तमानात विद्यार्थ्यांच्या समग्र विकासापेक्षा केवळ बौद्धिक विकासाचा विचार अधिक केला जात आहे. दुर्दैवाने बौद्धिक विकासाची प्रक्रिया देखील समग्रतेची आणि शास्त्रीय पद्धतीने होताना दिसत नाही. बौद्धिक विकासाची प्रक्रिया खरेच घडते आहे का? याबद्दल शंका यावी अशीच परिस्थिती आहे. बौद्धिक विकासाच्या प्रक्रियेचे मूल्यमापन आपण केवळ मार्कांमध्ये करतो आहोत. मार्कांमुळे फार तर वर्तमानातील पाठांतराची प्रक्रिया परीक्षा पद्धतीतून मापन करणे शक्य होईल. त्यातून विद्यार्थ्यांचे आकलन, विचार प्रक्रिया, चिंतन, मननाची वाट पडताळून पाहता येणे शक्य नाही. किंबहुना त्या वाटेने जावे असे वाटणार्या पालकांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. त्यामुळे आपल्याला खरोखर शिक्षणातून नेमके काय हवे आहे याचा शोध घेण्याची गरज निर्माण झाली आहे. त्या संदर्भाने समर्थ रामदास स्वामी अत्यंत महत्त्वाची दृष्टी देऊन काही सांगू पाहात आहेत. त्यांनी दासबोधात शिक्षणाचा जो व्यापक विचार प्रतिपादन केला आहे, तो समजावून घेण्याचा प्रयत्न केला, तर आपल्याला शिक्षणाचा खरा अर्थ समजून घेण्यास मदत होईल.

अलीकडे देशात शालेय स्तरावरील शिक्षणाचा विचार केला, तर शिक्षणातून आपल्याला केवळ डॉक्टर, अभियंते निर्माण करायचे आहेत. दोन लाख वैद्यकीय जागांसाठी भारतात चोवीस लाख विद्यार्थी प्रवेश पूर्व परीक्षेला प्रविष्ट होत आहेत. याचा अर्थ बावीस लाख विद्यार्थी येथे अपयशी ठरत आहेत यात शंका नाही. आताही बावीस लाख विद्यार्थी अकरावी-बारावीच्या विविध विषयांची, किंबहुना वर्गातील विषयांचा अभ्यास न करता परीक्षेची तयारी न करता केवळ प्रवेश परीक्षेसाठीच्या मर्यादित अभ्यासक्रमाची वाट चालली जाते आहे. विद्यार्थी केवळ तेवढ्यासाठी स्वतःला गाडून घेत अभ्यास करत आहेत. ते करताना फक्त विशिष्ट विषयांचा अभ्यास हेच एकमेव ध्येय बनले आहे. त्या विशिष्ट परीक्षांना इतके मार्क मिळवायचे आहेत की, आपल्याला निश्चित केलेल्या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळायला हवा. यात मात्र कुठेही शिक्षण म्हणून अपेक्षित केलेल्या विकासाच्या प्रक्रियेचा विचार होताना दिसत नाही. विद्यार्थ्यांना महाविद्यालयात नाही गेले तरी चालते, त्यांना त्यासाठी शिकवणी लावली जाते. शारीरिक गरज म्हणून आवश्यक असलेली झोप वगळता सातत्याने अभ्यासासाठी वेळ द्यावा लागत आहे. या काळात विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासाची प्रक्रिया, मानसिक, सामाजिक, भावनिक विकासासाठी काहीच घडताना दिसत नाही. अशावेळी या विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचा अर्थ केवळ पुस्तकातील माहितीचे पाठांतर, परीक्षेची तयारी, घोका आणि ओका इतक्या मर्यादित अर्थाने हे घडते आहे. समर्थ रामदास स्वामींनी दासबोध या ग्रंथात शिक्षणाचे खरे स्वरूप स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञान नाही. **(क्रमश उद्याच्या अंकात..)**

# मज्जासंस्थेची काळजी घेण्यासाठी महत्त्वपूर्ण टिप्स

मज्जासंस्था (Nervous System) हे आपल्या शरीराचे नियंत्रण केंद्र आहे. निरोगी मज्जासंस्थेसाठी दररोज व्यायाम करा, सकस आणि संतुलित आहार घ्या, पुरेशी झोप घ्या आणि तणाव व्यवस्थापनासाठी ध्यान किंवा प्राणायाम करा. तंबाखू, मद्यपान टाळा आणि मधुमेह असल्यास तो नियंत्रणात ठेवा.सकस आहार आहारात ताज्या भाज्या, फळे, संपूर्ण धान्य आणि व्हिटॅमिन बी-१२ (इ-१२) युक्त पदार्थांचा समावेश करा. हे मज्जातंतूंचे आरोग्य सुधारण्यास मदत करते.नियमित व्यायाम: आठवड्यातून किमान १५० मिनिटे शारीरिक हालचाल किंवा व्यायाम करा. व्यायामामुळे रक्ताभिसरण सुधारते आणि मज्जातंतूंचे कार्य सुरळीत चालते.पुरेशी झोप दररोज ७ ते ८ तास गाढ आणि सलग झोप घ्या. झोपेमुळे मेंदूला विश्रांती मिळते आणि स्मरणशक्ती सुधारते.तणाव नियंत्रण (डींर्शीी चरपरसशाशपीं): तणावामुळे मज्जासंस्थेवर वाईट परिणाम होतो. यासाठी ध्यान (चशवळींरींळेप) आणि योगासने यांचा दैनंदिन जीवनात समावेश करा.पाणी भरपूर प्या डिहायड्रेशनमुळे मज्जासंस्थेचे कार्य मंदावते. त्यामुळे दिवसभरात भरपूर पाणी प्या.व्यसनांपासून दूर राहा धूम्रपान आणि जास्त प्रमाणात मद्यपान केल्याने मज्जातंतूंचे नुकसान होऊ शकते.वैद्यकीय मदत केव्हा घ्यावी?जर तुम्हाला हाता-पायांमध्ये मुंग्या येणे, जळजळ होणे, सुन्नपणा जाणवणे किंवा सतत तीव्र डोकेदुखी व चिंतेचा त्रास होत असल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या.तणाव कमी करण्यासाठी आणि मज्जासंस्थेला शांत ठेवण्यासाठीच्या काही सोप्या पद्धती पाहण्यासाठी खालील व्हिडिओ पाहू शकता:



---

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा

### तुमच्या बाळाच्या काही महत्वाच्या हेल्थ टिप्स




मागील काही शास्त्रीय कारण आहे. तसं तर चांदीच्या ताटात किंवा पात्रात प्रत्येकानेच जेवायला हवे. लहान मुलांना दिल्यास त्यांचा शारीरिक, मानसिक विकास चांगला होतो. बाळाला अनेक व्याधी आणि आजारांपासून संरक्षण करता येते. बाळास चांदीत जेवू घातल्याने किंवा पाणी पाजल्याने पोटदुखी, डायरिया, पोटाचे इतर आजारानं पासून रक्षण होते. लहान मुलांची स्मरणशक्ती वाढते, आणि अन्य संसर्गा पासून रक्षण होते. आपण चांदीचा वापर करण्याचे फायदे बघू या...**क्रमशः**

## २ Joke — विनोद




**शिक्षक : चालढकल याचा अर्थ सांगा.**
**विद्यार्थी : उद्या सांगितला तर चालेल?**

## ३ Message — संदेश



Wife: doctor ji, mere pati neend mein baat karna shuru kardiye hai. kya karu?
Doctor: din mein unko baat karne kaa mouka deejiye.

## ४ Thought — सुविचार



भटक्या मनाच्या अवस्थेमध्ये डोळ्यांना काहीही दिसत नाही.
- पी. सायरस


**संस्कृत सुभाषित**

अधनाद्धि निर्वन्तते ज्ञातय: सुहृदो द्विजा
:अपुष्पाद्फलाद्वृक्षाद्यथा कृष्ण पतत्रिण:।।
(उद्योगपर्व, अध्याय ७२, श्लोक २० महाभारत)

अर्थ : ज्याप्रमाणे पक्षी पुष्परहित व फलरहित वृक्षाचा त्याग करतात, त्याप्रमाणे दरिद्री मनुष्याचे नातलग व इष्टमित्र त्याला सोडून जातात.

---

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. रमेश देवबरोबरच्या या सिनेमात सीमा खलनायिका होती
६. ऐनवेळी कच खाणारा
११. न्याय
१२. सोशिकपणा
१४. नवरा
१५. अरण्य
१६. लोटी
१८. उगवत्या सूर्याचा देश
२१. च्या पुढे, समक्ष
२३. वेळेचा कमीत कमी भाग
२४. विरोध, प्रतिबंध
२७. पत, प्रतिष्ठा
२८. शंकराजवळचे चर्मवाद्य
२९. टप्प्याने टप्प्याने केलेला प्रवास
३२. अवधान, लक्ष
३३. भडक
३६. पळून जाणे
३९. कलावंत
४१. मत नोंदवण्याचा कालबाह्य कागद
४४. सोसाट्याचा वारा
४५. पवित्र
४६. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
४९. परिस्थिती, कालाचे परिमाण
५२. सामान
५३. बस्तान
५४. मज्जाव
५६. आश्रय, थारा
५८. प्रकाश निर्माण करणारा सूर्य
६०. वाहणारी हवा
६१. जन्मदाते
६३. पाणी
६५. दक्ष
६६. यजमान
६७. आरोप, बालंट
६८. प्रयाण
६९. लोकमानस
७१. इच्छा, आकांक्षा (हिंदी)
७३. आपल्या उत्तर सीमेवरील एक राष्ट्र
७५. किंचित ओलावलेले (डोळे) (हिंदी)
७६. कामाचा उरका
७८. शिव
८०. अवाजवी
८२. भाजपा नेते 'नितीन ----'
८४. संथ
८५. स्तुतीची गाणी
८६. दुःखी होणे, वेदनेने ओरडणे

### उभे शब्द

१. लकब
२. खिशाला चाट
३. धास्ती, भीती
४. आपले राष्ट्रगीत
५. आलटापालट
७. खून
८. शिकारीसाठी हेरलेला प्राणी
९. डोसा
१०. शरीर, काया
१३. गलबताचे कापड
१७. भाकरी व इतर पदार्थांचा कुस्करा, दूधभाकरी
१९. वैमानिक (इंग्रजी)
२०. अंकुर
२२. रम्य, मनोहर
२५. दात
२६. अंधार
२७. फोडणीचे वरण
३०. प्रचंड
३१. जपजाप्य
३४. बगळा
३५. थेंब, सरळ
३७. लोकरीचा एक प्रकार
३८. लग्नकार्याचे लेखी आमंत्रण
४०. लबाडीचा हेतू
४२. सर्वस्वाने
४३. यापेक्षा 'आज' महत्त्वाचा
४५. पालनपोषण करणारा
४७. शोभणारा
४८. मृत्यूदेवता
५०. जयश्री गडकरचा चंद्रकांत गोखले यांच्या बरोबरचा गाजलेला चित्रपट
५१. नूतन
५२. तंबाखूचा असल्यास घातक
५५. मानबिंदू (ला.)
५७. कमळ
५८. दिवस
५९. कणीदार
६०. संसारातून अंग काढून घेणे
६१. सुखाच्या मोजमापाचे धान्य
६२. दाह, मत्सर
६४. मिरवणूक
६५. पत्राचा कालबाह्य झालेला मायना
६६. नम्रतेने मान खाली घालणे
६७अ. आल्या पावली, लगेच
७०. 'राही --- दुख की चिंता क्यों सताती है' (दोस्ती)
७२. थकवा
७४. सांभाळ
७७. खाली खेचणे, पराभूत करणे
७८. अधिकाराचे स्थान
७९. त्रासलेला
८०. शर्त
८२. माराची उठलेली खूण
८३. अस्वल

### आडवे उत्तरे

१.अपराध ६.अवसानघातकी ११.दाद १२.सहनशीलता १४.धव १५.वन १६.गडवा १८.जपान २१.समोर २३.क्षण २४.हरकत २७.आब २८.डमरू २९.मजलदरमजल ३२.भान ३३.बटबटीत ३६.पलायन ३९.कलाकार ४१.मतपत्रिका ४४.वादळ ४५.पाक ४६.पसायदान ४९.कालमान ५२.माल ५३.जम ५४.मना ५६.निवारा ५८.दिवाकर ६०.वारा ६१.जनकजननी ६३.जीवन ६५.सावध ६६.नवरा ६७.किटाळ ६८.प्रस्थान ६९.जनमत ७१.तमन्ना ७३.नेपाळ ७५.नम ७६.रपाटा ७८.पवित्र ८०.अवास्तव ८२.गडकरी ८४.मंद ८५.स्तवन ८६.कळवळणे

### उभे उत्तरे

१.अदा २.पदरमोड ३.धसका ४.जन गण मन ५.हलवाहलवी ७.वध ८.सावज ९.घावन १०.तन १३.शीड १७.भाकरकाला १९.पायलट २०.कोंब २२.रमणीय २५.रद २६.तम २७.आमटी ३०.जबरदस्त ३१.जपतप ३४.बक ३५.तडक ३७.नमदा ३८.पत्रिका ४०.कावा ४२.तनमनधनाने ४३.काल ४५.पालक ४७.साजरा ४८.यम ५०.मानिनी ५१.नवा ५२.मावा ५५.नाक ५७.राजीव ५८.दिन ५९.रवाळ ६०.वानप्रस्थ ६१.जव ६२.जळजळ ६४.वरात ६५.सा न वि वि ६६.नतमस्तक ६७अ.टाकोटाक ७०.मनवा ७२.मरगळ ७४.पालन ७७.पाडणे ७८.पद ७९.त्रस्त ८०.अट ८२.वळ ८३.रीस




## थोडक्यात/ संक्षिप्त

### फिफा विश्वचषक फुकट पाहता येणार का? टीव्ही अन् मोबाईलवर लाइव्ह मॅच पाहण्याची नवी ट्रिक

नवी दिल्ली–२०२६ च्या फिफा विश्वचषक स्पर्धेला गुरुवारी (भारतीय वेळेनुसार शुक्रवारी) सुरुवात होत असून उद्घाटन सामन्यात सहऱ्यजमान मॅक्सिको आणि दक्षिण आफ्रिका हे संघ आमनेसामने येणार आहेत. ४८ संघांच्या या विश्वचषकात एकूण १०४ सामने खेळवले जाणार आहेत.
यंदाची स्पर्धा अमेरिका, मॅक्सिको आणि कॅनडा या तीन देशांमध्ये आयोजित करण्यात आली आहे. विश्वचषकाच्या इतिहासात प्रथमच तीन देश संयुक्तपणे यजमानपद भूषवत आहेत. भारताने या स्पर्धेसाठी पात्रता मिळवली नसली तरी देशात विश्वचषकाबाबत प्रचंड उत्सुकता आणि चर्चा पाहायला मिळत आहे. फिफाचा मोठा करार स्पर्धा सुरू होण्याच्या अवघ्या दहा दिवस आधी फिफाने नशश एपींर्शीरळपाशपीं एपींशीींळिशी सोबत भारतातील प्रसारण हक्कांसाठी व्यापक करार केला. या कराराअंतर्गत २०३४ पर्यतच्या ३९ फिफा स्पर्धांचे प्रसारण झीकडे राहणार आहे.
झीने या कराराची अधिकृत आर्थिक माहिती जाहीर केलेली नसली तरी विविध अहवालांनुसार फिफाने आपल्या सुरुवातीच्या मागणीपेक्षा किंमत कमी करत सुमारे ६० दशलक्ष अमेरिकन डॉलर्सच्या आसपास हा बहुवर्षीय करार अंतिम केला. विश्वचषकाचे सामने कुठे पाहता येणार? विश्वचषकाच्या ऑनलाइन स्ट्रीमिंगसाठी मोठ्या प्रमाणात चाहतें एए५ वर सदस्यत्व घेत आहेत. दुसरीकडे अनेक प्रेक्षक त्यांच्या केबल किंवा डीटीएच सेवा पुरवठादारांशी संपर्क साधून नव्याने सुरू झालेल्या ळहगू८ एज्दीू चॅनेल्सची सदस्यता घेत आहेत.

### रोहित,विराटसाठी गुडन्यूज! वनडे वर्ल्ड कप२०२७च्या तारखा ठरल्या

दिल्ली–आयसीसीने दक्षिण आफ्रिका, झिम्बाबे आणि नामिबिया या तीन देशात होणाऱ्या वनडे वर्ल्ड कप २०२७ स्पर्धेची संभाव्य तारीख जाहीर केली आहे. त्यानुसार २०२७ चा हा वर्ल्डकप ४ ऑक्टोबर २०२७ ते २१ नोव्हेंबर २०२७ दरम्यान खेळवण्यात येणार आहे.या तारखा जाहीर झाल्यानंतर टीम इंडियाचा रोहित शर्मा आणि विराट कोहलीला गुडन्यूज मिळाली आहे. कारण दोघांचं वर्ल्ड कप जिंकवण्याच स्वप्न आणखी जवळ आलं आहे. दरम्यान आयसीसीने जाहीर केलेला हा कार्यक्रम नेमका कसा आहे? हे जाणून घेऊयात.
ईसपीएन क्रिकइन्फोच्या वृत्तानुसार, २०२७ चा आयसीसी मेन्स वनडे वर्ल्डकप ४ ऑक्टोबर २०२७ ते २१ नोव्हेंबर २०२७ दरम्यान होण्याची शक्यता आहे. या स्पर्धेसाठी दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया हे यजमानपद विभागून घेतील. मे महिन्यात अहमदाबाद येथे झालेल्या आयसीसी बोर्डाच्या बैठकीत या प्रस्तावित वेळापत्रकावर चर्चा करून त्याला व्यापक मंजुरी देण्यात आली होती, तर जुलैमध्ये एडिनबर्ग येथे होणाऱ्या नियामक मंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत याला औपचारिक मान्यता मिळण्याची शक्यता आहे.
या स्पर्धेचा सर्वाधिक भार हा दक्षिण आफ्रिकेवर आहे. कारण ५४ पैकी किमान ४१सामने दक्षिण आफ्रिकेच्या आठ मैदानांवर, तर आठ ते दहा सामने झिम्बाब्वेमध्ये आणि तीन सामने नामिबियामध्ये आयोजित केले जाण्याची शक्यता आहे.
२०२७ च्या स्पर्धेत १४ संघ सहभागी होतील आणि मागील दोन वर्ल्डकपसाठी सोडून दिलेले मोठे स्वरूप पुन्हा आणले जाईल.

### अफगाणिस्तानने ड्रेसिंग रुमम ध्ये मॅच फिरवली,भारताचा धक्कादायक पराभव

मुंबई–रणगिरी दाम्बुला इंटरनेशनल स्टेडिअमवर पार पडलेल्या सामन्यात अफगाणिस्तानने डिएलएस म `थडनुसार भारताचा अवघ्या ४ धावांनी पराभव केला आहे. खरं तर या सामन्यात भारताने ३५० धावांचे लक्ष्य ठेवले होते. हे लक्ष्य गाठून हा सामना जिंकणे अफगाणिस्तानसाठी अवघड होते. पण पाऊस पडला आणि डिएलएस मेथडनुसार अफगाणिस्तानला ३८ ओव्हरला २९४ चे लक्ष्य गाठायचे होते. यावेळी पावसामुळे मिळालेल्या ब्रेकमुळे अफगाणिस्तानने ड्रेसिंग रुममध्ये रणनिती आखली आणि डिएलएस मेथडनूसार ही सामना जिंकवून दाखवला.दरम्यान हा सामना अफगाणिस्तानने कसा जिंकला आणि तिलक वर्मा कॅप्टन्सीच्या पहिल्याच संकटात कसा फेल ठरला? हे जाणून घेऊयात.खरं तर टीम इंडियाने प्रथम फलंदाजी करताना ३४९ धावा केल्या होत्या.त्यामुळे अफगाणिस्तानसमोर ३५० धावांचे लक्ष्य होते. दरम्यान अफगाणिस्तानच्या बॅटींग आधीच पाऊस पडला त्यामुळे डिएलएस मेथडनुसार अफगाणिस्तानला ३८ ओव्हरमध्ये २९४ धावा करायच्या होत्या. यावेळी अफगाणिस्तानने चांगली सूरूवात केली होती. अफगाणिस्तानच्या दोन्ही ओपनर्सची जबरदस्त फलंदाजी करत पहिल्या विकेटसाठी ६३ धावा जोडल्या.यावेळी हसन इसाखिल ३४ वर बाद झाला.त्याच्यानंतर खालिद तानिवाल २ धावांवर बाद झाला.दोन विकेट पडल्यानंतर टीम इंडिया झटपट विकेट काढेल असे वाटत होते. पण कॅप्टन इम्रान मीर आणि बाहिर शाहने जबरदस्त फलंदाजी केली होती.




# बांगलादेशाचा ऑस्ट्रेलियावर २१ वर्षांनंतर ऐतिहासिक विजय

एकदिवसीय सामन्यात ८६ धावांनी केले पराभूत; नाहिद राणाने ४ बळी

मिरपूर : मिरपूर येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात बांगलादेशाने डकवर्थ–लुईस (डीएलएस) पद्धतीनुसार ऑस्ट्रेलियाला ८६ धावांनी पराभूत केले. एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासात ऑस्ट्रेलियाविरुद्धचा हा बांगलादेशाचा दुसरा विजय आहे. त्यांनी २००५ मध्ये पहिल्यांदा ऑस्ट्रेलियाला पराभूत केले होते. चार वर्षांनंतर संघात परतलेल्या मोसादेक हुसेनने या सामन्यात नाबाद ८६ धावा केल्या आणि दोन बळी घेतले. नाहिद राणाने चार बळी घेतले.
नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशाने आपल्या निर्धारित ५० षटकांत ८ गडी गमावून २८४ धावा केल्या. २८५ धावांचे लक्ष्य गाठताना, ऑस्ट्रेलियाने ४२.२ षटकांत ९ गडी गमावून १९१ धावा केल्या होत्या. अपुरा प्रकाश आणि पावसामुळे खेळ थांबवण्यात आला. खेळ पुन्हा सुरू होऊ न शकल्याने, डकवर्थ–लुईस पद्धतीनुसार बांगलादेशाला ८६ धावांनी विजेता घोषित करण्यात आले.

## पाकिस्तानच्या संघाची घोषणा

**लाहोर :** पाकिस्तानने जपानमध्ये होणार्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील पुरुषांच्या टी–२० क्रिकेट स्पर्धेसाठी सलामीवीर साहिबजादा फरहानच्या नेतृत्वाखालील १५ सदस्यीय संघाची बुधवारी घोषणा केली. बाबर आझम, महंमद रिझवान, शाहीन शाह आफ्रिदी, हरिस रौफ आणि शादाब खान यांसारख्या वरिष्ठ स्टार खेळाडूंचा संघात समावेश करण्यात आलेला नाही. फरहान आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पहिल्यांदाच पाकिस्तानचे कर्णधारपद भूषवणार आहे. पाच टी–२० आंतरराष्ट्रीय



सामने खेळलेल्या अब्दुल समदला उपकर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. केवळ अबरार अहमद, उस्मान खान आणि सैम अयुब यांनीच अलीकडे लक्षणीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळले आहे. संघात अकीफ जावेद, अली रझा, माझ सदाकत आणि साद मसूद यांनी अद्याप टी–२० आंतरराष्ट्रीय पदार्पण केलेले नाही. आशियाई खेळ १९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर दरम्यान ऐची–नागोया येथे आयोजित केले जातील.

## सिंधूचा विजय

सिडनी : दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधूच्या नेतृत्वाखाली, भारतीय महिला खेळाडूंनी बुधवारी येथे ऑस्ट्रेलियन ओपन सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेत वर्चस्वपूर्ण कामगिरी केली, तर तन्वी शर्मानेही एक मोठा उलटफेर घडवून आणला. तिसर्या मानांकित सिंधू, तन्वी, मालविका बन्सोड, इशारानी बरुआ आणि तान्या हेमंत या सर्वांनी १६ च्या फेरीत प्रवेश केला. मात्र, भारतीय पुरुष एकेरी खेळाडूंसाठी बुधवारचा दिवस निराशाजनक ठरला.

३४९ धावांचा डोंगर उभारूनही टीम इंडिया 'अ' चा पराभव

## पावसाच्या व्यत्ययाने अफगाणिस्तान 'अ' संघाचा दमदार विजय



मुंबई–भारत 'अ' आणि अफगाणिस्तान 'अ' यांच्यात पार पडलेल्या तिरंगी मालिकेतील दुसऱ्या सामन्यात एक धक्कादायक निकाल पाहायला मिळाला.
तब्बल ३४९ धावांचे अवाढव्य लक्ष्य उभारूनही भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला. पावसामुळे सामन्यात वारंवार व्यत्यय आल्याने शेवटी डकवर्थ–लुईस (थए) नियमाचा फटका भारतीय संघाला बसला आणि अफगाणिस्तान 'अ' संघाने बाजी मारली.
भारताची फलंदाजी: धावांचा महापूर
नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने आक्रमक सुरुवात केली. प्रभसिमरन सिंग आणि युवा वैभव सूर्यवंशी यांनी अवघ्या ७.१ षटकांत ७४ धावांची भागिदारी करून दिमाखदार सुरुवात करून दिली. वैभव सूर्यवंशीने अवघ्या २२ चेंडूंमध्ये ९ चौकारांच्या मदतीने ४४ धावांची वादळी खेळी केली. यानंतर प्रभसिमरन सिंगने ८४ (६९ चेंडू, १४ चौकार) तर कर्णधार तिलक वर्मा आणि ऋतुराज गायकवाड यांनी प्रत्येकी ६६ धावांचे योगदान दिले. डावाच्या अखेरीस सूयांश शेडगेने २७ चेंडूंत ४० धावा फटकावल्या, ज्यामुळे भारताला ९ बाद ३४८ धावांपर्यंत मजल मारता आली. अफगाणिस्तानकडून अब्दोल्लाह अहमदजाईने ५ बळी टिपत भारतीय फलंदाजीला खिंडार पाडले.
अफगाणिस्तानचे प्रत्युत्तर आणि पावसाचा खेळ
३४९ धावांचा पाठलाग करताना अफगाणिस्तानची सुरुवात आक्रमक झाली. कर्णधार इम्रान आणि हसन ऐसाखिल यांनी पहिल्या विकेटसाठी ६३ धावा जोडल्या. भारताच्या अर्शद खान आणि अनुकूल रॉय यांनी काही विकेट्स मिळवून सामन्यात पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला. मात्र, तिसऱ्या विकेटसाठी इम्रान आणि बहिर शाह यांनी १०८ धावांची अभेद्य भागीदारी रचली. अफगाणिस्तानने २५.५ षटकांत २ बाद १७७ धावा केल्या असताना जोरदार पावसाने हजेरी लावली. यावेळी बहिर शाह ५१ आणि इम्रान ७५ धावांवर खेळत होते.
डकवर्थ–लुईस नियमाने घातला घाला–पाऊस थांबण्याचे नाव घेत नसल्याने पंचांनी डकवर्थ–लुईस नियमाचा आधार घेतला. त्यावेळी अफगाणिस्तानचा संघ आवश्यक धावसंख्येपेक्षा ३ धावांनी पुढे होता. नियमांच्या आधारे अफगाणिस्तानला ४ धावांनी विजयी घोषित करण्यात आले. भारतीय फलंदाजांनी केलेल्या मेहनतीवर पावसाने पाणी फेरल्याने चाहत्यांमध्ये नाराजी दिसून आली.

## फिफा वर्ल्डकपमधील रेफरीचा दहशतवाद्यांशी संबंध!

**अमेरिकन अधिकाऱ्याच्या दाव्याने खळबळ**

दिल्ली–सोमाली रेफरी ओमर अर्तान याला फिफा विश्वचषकात पंचगिरी करता येणार नाही. अमेरिकेत त्यांचा प्रवेश नाकारण्यात आल्यामुळे त्यांना आता फिफा विश्वचषकात सहभागी होता येणार नाही. आता अमेरिकेमध्ये सोमाली रेफरी ओमर अर्तान याच्यावर बंदी घातल्यानंतर एक धक्कादायक कारण समोर आले आहे.
२०२५ मध्ये रेफरी ओमर अर्तान यांना आफ्रिकेचा वर्षातील सर्वोत्कृष्ट रेफरी पुरस्कार देण्यात आला होता. त्याचबरोबर फिफा विश्वचषकात अंतिम फेरीत रेफरी म्हणून काम पाहणारे पहिले सोमाली ठरणार होते. पण जेव्हा ते विमानतळावर पोहोचले तेव्हा त्यांचा पासपोर्ट आणि व्हिसा असुनही त्याचा प्रवेश रोखण्यात आला यामागचे कारण काय हे ऐकून तुम्हाला धक्का बसेल.
रेफरी ओमर अर्तान हे बुधवारी सोमालियामध्ये परतले, आता राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलेल्या प्रवासबंदीच्या यादीतील १२ देशांपैकी सोमालिया हा एक देश आहे.
प्रशासनाच्या एका सूत्राने माहिती दिली आहे की, अमेरिकेमध्ये हा व्यक्ती प्रवेश करण्याचा प्रयत्न करत होता. या सूत्राने अशीही माहिती दिली आहे की, सीमाशुल्क आणि सीमा संरक्षणाच्या मार्फत या तपासामध्ये दहशतवादी संघटनांच्या संशयित सदस्यांशी संबंध उघड झाले आहे. त्यामुळे इमिग्रेशन आणि नॅशनॅलिटी ॲक्ट अंतर्गत या व्यक्तीचा प्रवेश नाकारण्यात आला आहे.
त्यांनी न्यूयॉर्क टाइम्सला दिलेल्या प्रतिक्रियेमध्ये सोमाली रेफरी ओमर अर्तान यांनी

## वैभवची तुफान खेळी, ऋतुराज–तिलकही चमकला,३४९ धावा करूनही टीम इंडिया कशी हरली?

मुंबई–श्रीलंकेच्या दाम्बुला इंटरनेशनल स्टेडिअमवर आज अफगाणिस्तान संघाने भारतीय संघाचा डिएलएस मेथडनूसार ४ धावांनी पराभव केला आहे. या सामन्यात भारतीय संघाने ३५० धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना अफगाणिस्तान २ विकेट गमावून १७७ धावाच करू शकली होती. त्यामुळे इतक्या कमी धावा करूनही अफगाणिस्तान हा सामना कशी हरली? हे जाणून घेऊयात.
खरं तर प्रथम फलंदाजी करताना टीम इंडियाची सूरूवात चांगली झाली नव्हती. टीम इंडियाकडून प्रभासिमरनने सर्वाधिक ६९ बॉलमध्ये ८४ धावांची खेळी केली होती. त्याच्यानंतर ऋतुराज गायकवाडने ६६ आणि तिलक वर्माने देखील ६६ धावांची खेळी केली होती. यासोबत वैभव सूर्यवंशीने २२ बॉलमध्ये ४४ धावांची खेळी केली होती. या खेळीच्या बळावर टीम इंडियाने ५० ओव्हरमध्ये ३४९ धावा केल्या होत्या. टीम इंडियाने इतका धावांचा डोंगर उभारलेला पाहून अफगाणिस्तान सहज हारेल असे वाटले होते. टीम इंडियाचा डाव संपल्यानंतर पाऊस पडला. हा पाऊस अफगाणिस्तानच्या मदतीला. या पावसामुळे अफगाणिस्तानसमोर डीएलएल मेथडनुसार ३८ ओव्हरमध्ये २९४ धावांचे लक्ष्य होते.
हे लक्ष्य सोप्पं नव्हतं. कारण पुन्हा पाऊस पडण्याची शक्यता होती, आणि भारत कोणत्याही क्षणी जिंकू शकलं असतं. अशावेळी मैदानात उतरण्यापूर्वी अफगाणिस्तानने खास रणनिती आखली. या रणनितीनुसार काही झालं तरी धावांचा वेग कमी होऊ द्यायचा नाही.त्यानुसार अफगाणिस्तानच्या दोन्ही ओपनर्सची जबरदस्त फलंदाजी करत पहिल्या विकेटसाठी ६३ धावा जोडल्या.यावेळी हसन इसाखिल ३४ वर बाद झाला.त्याच्यानंतर खालिद तानिवाल २ धावांवर बाद झाला.
दोन विकेट पडल्यानंतर टीम इंडिया झटपट विकेट काढेल असे वाटत होते. पण कॅप्टन इम्रान मीर आणि बाहिर शाहने जबरदस्त फलंदाजी केली होती. विशेष म्हणजे या दोन्ही खेळाडूंना पाऊस पुन्हा पडण्याची कल्पना होती. त्यामुळे मॅच कोणत्याही क्षणी रद्द होऊन सामन्याचा निकाल लागण्याची शक्यता होती. त्यामुळे त्यांनी डिएलएस मेथडनुसार अधिकच्या धावा स्कोअर बोर्डवर लागतील या हेतून बॅटींग सूरू केली. आणि ज्यावेळेस दुसऱ्यांदा पाऊस पडला तेव्हा ते डिएलएस मेथडनुसार ४ धावा अधिकच्या अफगाणिस्तानने केल्या होत्या. त्यामुळे या ४ धावाच त्यांच्या विजयाचं मुख्य कारण ठरलं आहे. जर या ४ अतिरिक्त धावा अफगाणिस्तानने केल्या नसत्या तर या सामन्यात भारत जिंकली असती. सामना रद्द झाल्यानंतर इम्रान मीर ७५ धावांवर आणि बाहिर शाह ५१ वर नाबाद राहिला होता.
टीम इंडियाच्या पराभवाचं कारण?
खरं तर टीम इंडियाने धावांचा डोंगर उभा केला होता. आता गोलंदाजांनी फक्त विकेटस काढणे गरजेचे होते.पण टीम इंडियाच्या गोलंदाजांना अफगाणिस्तानच्या झटपट विकेट काढता आल्या. विशेष म्हणजे जरी बॉलर्सना विकेट काढता आल्या नसल्या तरी त्यांनी धावा रोखने गरजेचे होते. कारण जर धावा रोखल्या असत्या तर डिएलएस मेथडहून अतिरीक्त धावा अफगाणिस्तानला करता आल्या नसत्या. पण यात भारत अपयशी ठरल्याने टीम इंडियाची हार झाली.त्यामुळेच तिलकची रणनिति चुकली होती.

## तुम्ही कितीही मोठे फलंदाज असाल, पण.., विराट -रोहितच्या फ्लॉप शो

**वर माजी खेळाडूची लक्षवेधी प्रतिक्रिया**

भारताचा संघ सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे. मालिकेतील पहिला सामना पर्थच्या मैदानावर पार पडला. या सामन्यात भारतीय संघाला ७ गडी राखून पराभवाचा सामना करावा लागला आहे. हा सामना रोहित शर्मा आणि विराट कोहलीसाठी अतिशय महत्वाचा होता. कारण दोन्ही फलंदाज ७ महिन्यानंतर आंतरराष्ट्रीय सामना खेळण्यासाठी मैदानात उतरले होते. पण दोन्ही फलंदाज पहिल्याच सामन्यात फ्लॉप ठरले आहेत. रोहित शर्मा अवघ्या ८ तर विराट कोहली शून्यावर माघारी परतला. दरम्यान भारताचा माजी फलंदाज मोहम्मद कैफने विराट कोहली आणि रोहित शर्मा बाबत मोठं वक्तव्य केलं आहे. मोहम्मद कैफच्या मते, विराट कोहली आणि रोहित शर्माने आधीच ऑस्ट्रेलियाला जायला हवं होतं. दोघांनीही लवकर ऑस्ट्रेलियाला जाणं टाळलं, याबाबत बोलताना मोहम्मद कैफ म्हणाला, ङ्गविराट कोहली आणि रोहित शर्माकडे सुवर्णसंधी होती, पण त्यांनी संघासोबत जाणं ठरवलं. कारण त्यांना माहीत आहे की, लोकं आपल्यासोबत आहेत. विराट इंग्लंडमध्ये होता.



त्यामुळे त्याच्यावर दबाव होता. तो जर परस्पर ऑस्ट्रेलियाला निघून गेला असता तर अडचणी वाढल्या असत्या. त्यामुळे तो फसला.ङ्ख

१ जागा अनब ४ संघ शर्यतीत, श्रीलंकेच्या विजयाने बदललं भारताचं सेमीफायनलचं समीकरण; तर न्यूझीलंडः; पाहा काय बदल झाला?

विराट आणि रोहितची नेमकी चूक काय झाली? याबाबत बोलताना मोहम्मद कैफ म्हणाला, ङ्गया दोघांनीही ८–१० दिवसांपूर्वीच ऑस्ट्रेलियाला जायला हवं होतं. तुम्ही कितीही मोठे फलंदाज असाल, पण क्रिकेट हा रिदमचा खेळ आहे. जर तुम्ही पूर्णपणे तयार नसाल तर ऑस्ट्रेलियासारख्या बलाढ्य संघासमोर तुमचा निभाव लागणार नाही. म्हणून मला वाटतं की, आधी गेले असते तर बरं झालं असतं. रोहित अशा चेंडूवर पूल करून षटकार मारतो.ङ्ख मालिकेतील पहिला सामना पर्थच्या मैदानावर पार पडला. या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं होतं. भारतीय संघाकडून पहिल्या डावात फलंदाजी करताना विराट, रोहित आणि गिल हे तिन्ही फलंदाज फ्लॉप ठरले. तर केएल राहुलने ३८ धावांची महत्वपूर्ण खेळी केली. या खेळीच्या बळावर २६ षटकांअखेर भारतीय संघाने ९ गडी बाद १३६ धावा केल्या. ऑस्ट्रेलिया डकवर्थ लुईस नियमानुसार १३१ धावा करायच्या होत्या. हे आव्हान ऑस्ट्रेलियाने २२ व्या षटकात पूर्ण करत सामना खिशात घातला.

## लातूर जिल्ह्यात रविवारी ३२ परीक्षा केंद्रांवर महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा उपकेंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**लातूर/प्रतिनिधी:** जिल्ह्यात रविवार, १४ जून २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १२ दरम्यान ३२ उपकेंद्रांवर महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा पूर्व परीक्षा-२०२६ आयोजित करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी सर्व परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात परीक्षेदिवशी सकाळी ८ ते दुपारी २ वाजेपर्यंत भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू केले आहे.

या आदेशानुसार परीक्षा केंद्राच्या परिसरात परीक्षार्थींशिवाय पाच किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास मनाई करण्यात आली असून, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यास किंवा शांततेस बाधा निर्माण होईल असे कृत्य करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच परीक्षा कालावधीत केंद्राच्या १०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर्स, पानटपरी, टायपिंग सेंटर, एसटीडी बूथ आणि ध्वनिक्षेपक ही सर्व माध्यमे बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. परीक्षा केंद्रात मोबाईल फोन, सेल्युलर फोन किंवा इतर कोणतीही प्रसार माध्यमे घेऊन प्रवेश करण्यास मनाई असेल, तसेच कोणत्याही अनधिकृत व्यक्तीला किंवा वाहनाला केंद्र परिसरात प्रवेश दिला जाणार नाही. हे निर्बंध परीक्षा कर्तव्यावर असलेल्या अधिकारी, कर्मचारी आणि पोलीस प्रशासनास लागू नसून, परीक्षेचे कामकाज शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासनाने हे प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

## राजमाता जिजामाता महाविद्यालयाचे सीईटी परीक्षेत घवघवीत यश



**लातूर/प्रतिनिधी:** एमएचटी-सीईटी परीक्षेचा निकाल मंगळवारी झाला असून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाने या परीक्षेच्या निकालाची उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे.

प्रतिक्षा प्रदिप तोरे ही विद्यार्थिनी पीसीबी ग्रुपमध्ये ९५ पर्सेंटाईल गुण घेऊन महाविद्यालयात प्रथम, ऋतुजा हणमंत मुळे ही ९३ पर्सेंटाईल द्वितीय तर रम्झा मोसिन खान ही ९१ पर्सेंटाईल गुण घेऊन महाविद्यालयात तृतीय आली आहे. त्याचप्रमाणे तंजिम जब्बार तांबोळी ८६.५८ पर्सेंटाईल, इशान सुशांत कुलकर्णी ८३, आरुष गुलाबराव राऊत ८२, कल्याणी महेश गताटे ७७ तर गौरी शिवराम वाघमारे हिने ७५ गुण मिळवले आहेत.

या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, संचालक मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, संचालक अश्विनी केंद्रे, प्रा. वैशाली केंद्रे, समन्वयक राजीव मुंढे, राजेंद्र जायेभाये, प्रा. बी. बी. खटके, प्रा. ए. एस. खोत, प्रा. डी. ए. फंड, प्रा. अमर क्षीरसागर, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते, शिवकांत वाडीकर आदींनी कौतुक केले आहे.

# राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत विविध घटकांसाठी २२ जूनपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**लातूर, दि. ११ (जिमाका):** राष्ट्रीय खाद्यतेल अभियान (गळितधान्य) सन २०२६-२७ अंतर्गत फ्लेक्झी फंड घटकातील विविध योजनांसाठी लातूर जिल्ह्यात अर्ज मागविण्यात येत असून, यासाठी २२ जून २०२६ पर्यंत संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे. या अभियानांतर्गत गोदाम बांधकाम व काढणी पश्चात पायाभूत सुविधांकरिता (तेलघाणा) ऑफलाईन, तर मिनी ऑइल मिल व एक्सपेलर या घटकासाठी 'महाडीबीटी' पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने शेतकरी, शेतकरी उत्पादक संघ, शेतकरी उत्पादक कंपनी आणि वैयक्तिक अर्जदारांना अर्ज करता येतील.

यातील गोदाम बांधकाम घटकासाठी सरकारी व खाजगी उद्योग, समूह आधारित व्यवसाय संस्था, शेतकरी उत्पादक संस्था किंवा कंपनी आणि सहकारी संस्थांना सहाय्य दिले जाणार असून यात सोयाबीन मूल्यसाखळी भागीदारांना प्राधान्य दिले जाईल. २५० मेट्रिक टन क्षमतेच्या गोदाम बांधकामासाठी येणाऱ्या अंदाजे २८.८० लाख रुपये खर्चाच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त १४.४० लाख रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल, त्याप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील. ही बाब बँक कर्जाशी निगडित असल्याने अर्जदाराने रिझर्व्ह बँकेच्या अधिकृत वित्तीय संस्थेकडून (ज्या बँकेच्या शाखांना आयएफएससी कोड आहे) बँक कर्ज अनुदानाकरिता ग्राह्य धरून प्रकल्प सादर करणे आवश्यक असून, या घटकासाठी लातूर जिल्ह्याला ३ गोदामांचे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे.

प्राथमिक तसेच दुय्यम स्त्रोतासाठी काढणी पश्चात पायाभूत सुविधा (तेलघाणा) अंतर्गत १० टन प्रतिदिन क्षमतेच्या तेल काढण्याच्या युनिट्सची (डिहलर, सीड क्लिनर, तेल काढण्याचे व गाळणी यंत्र) खरेदी व स्थापनेसाठी मदत दिली जाणार आहे. बीआयएस किंवा समकक्ष गुणवत्ता मानकांचे पालन करणारी आणि एकापेक्षा जास्त प्रकारच्या तेलबियांवर प्रक्रिया करण्याची क्षमता असलेल्या या यंत्रसामुग्रीसाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल ९.९० लाख रुपये यापैकी जे कमी असेल ते अनुदान दिले जाईल. लातूर जिल्ह्याकरिता या घटकाचे १ उद्दिष्ट असून सरकारी व खाजगी उद्योग, वैयक्तिक लाभार्थी, शेतकरी उत्पादक संस्था व नोंदणीकृत कंपन्यांना याचा लाभ घेता येईल.

याव्यतिरिक्त मिनी ऑइल मिल आणि एक्सपेलर या घटकासाठी वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी व मूल्य साखळी भागीदारांनी 'महाडीबीटी' पोर्टलवर कृषी यांत्रिकीकरण अभियानांतर्गत ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. यात फिल्टर प्रेससह असलेल्या युनिटसाठी ५० टक्के किंवा कमाल ४ लाख रुपये, तर फिल्टर प्रेसशिवाय असलेल्या युनिटसाठी ५० टक्के किंवा कमाल ३ लाख रुपये प्रति युनिट अनुदान अनुज्ञेय राहणार आहे. पात्र व इच्छुक लाभार्थ्यांनी या महत्त्वपूर्ण योजनांचा लाभ घेण्यासाठी विहित मुदतीत आपले अर्ज दाखल करावेत, असे कृषी विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

# तांदुळजा खुल्या क्रिकेट स्पर्धेतील आमदार चषक तिरंगा क्रिकेट क्लब मसला संघाने पटकावला




**लातूर/प्रतिनिधी:** लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे कार्यसम्राट आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्ताने लातूर तालुक्यातील मौजे तांदूळजा येथे आयोजित करण्यात आलेल्या आमदार चषक खुल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत मसला येथील तिरंगा क्रिकेट क्लब सर्वप्रथम विजेता ठरला असून या स्पर्धेतील प्रथम, द्वितीय आणि तृतीय संघांना बक्षीस वितरण करण्यात आले.

लातूर तालुक्यातील मौजे तांदूळजा येथे आ. रमेशआप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्ताने मोठ्या उत्साहाच्या वातावरणात आमदार चषक खुल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा झाल्या. या स्पर्धेत तब्बल ३२ संघाने सहभाग घेतला होता. यशस्वी संघांना लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात भाजपाचे नेते

आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते रोख पारितोषिक, चषक, मेडल आणि सन्मानपत्राचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे, भाजपाचे मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, सुरज शिंदे, अशोक सावंत, भैरवनाथ पिसाळ, बाबा भिसे आदींची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी स्पर्धेतील यशस्वी खेळाडूंचे आ. कराड यांनी कौतूक केले.

आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते स्पर्धेतील यशस्वी प्रथम क्रमांक तिरंगा क्रिकेट क्लब मसला ३१ हजार रुपये व चषक, द्वितीय क्रमांक श्री गणेशा क्रिकेट क्लब कानडी बोरगाव २१ हजार रुपये व चषक, तृतीय पारितोषक कॉमन वेल्थ क्रिकेट क्लब बोरडा ११ हजार रुपये व चषक मॅन ऑफ द सिरीज राहुल राठोड, मॅन ऑफ द मॅच समाधान सोनटक्के बेस्ट विकेट किपर विजय आल्टे यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी अंकुश गणगे, संतोष गायकवाड, नरेंद्र अल्टे, रामहरी भिसे, सचिन कांबळे, नुरखॉ पठाण, विष्णू कसबे, बाबा नवगिरे, बिभीषण शिंदे, शैलेश कसबे यांच्यासह विजयी तिन्ही संघातील खेळाडू व क्रीडा प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तुळजाभवानी महाविद्यालयाचे सीईटी परीक्षेत घवघवीत यश



**लातूर/प्रतिनिधी:** एमएचटी-सीईटी परीक्षेचा निकाल मंगळवारी झाला असून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी तुळजाभवानी कनिष्ठ महाविद्यालयाने या परीक्षेच्या निकालाची उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे.

कुलदीप कैलासराव झोल हा विद्यार्थी पीसीबी ग्रुपमध्ये ९८.५८ पर्सेंटाईल गुण घेऊन महाविद्यालयात प्रथम, कुलस्वामिनी कैलासराव झोल व जोहा जहाँगीर शेख या अनुक्रमे ९१.६० पर्सेंटाईल गुण घेऊन द्वितीय तर युवराज विष्णू मोहिते हा ८७ पर्सेंटाईल गुण घेऊन महाविद्यालयात तृतीय आला आहे. याबरोबरच आर्या श्रीमंत दोरवे हिने ८० पर्सेंटाईल गुण मिळविले आहेत. या यशाबद्दल संस्थेच्या सचिव के. ए. जायेभाये, प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे आदींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

## अन्नदान, गोसेवा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत संजय राजुळे यांचा वाढदिवस साजरा



**लातूर/प्रतिनिधी:** सामाजिक कार्यकर्ते तथा संपादक संजय राजुळे यांनी आपला वाढदिवस समाजोपयोगी आणि पर्यावरणपूरक उपक्रमांनी साजरा करत समाजासमोर एक आदर्श निर्माण केला. वृक्षारोपण, अन्नदान, गोसेवा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत त्यांनी वाढदिवसाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी जपली. वाढदिवसानिमित्त सकाळी साडेसहा वाजता वृक्ष प्रतिष्ठानच्या माध्यमातून २५१ झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पर्यावरण संवर्धनाची शपथ घेऊन वृक्ष लागवड व संगोपनाचा संकल्प करण्यात आला.

त्यानंतर सकाळी ८ वाजता आणि दुपारी १२ वाजता जिल्हा शासकीय रुग्णालय (सिव्हिल हॉस्पिटल), लातूर येथे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी अन्नदान करण्यात आले. तसेच दुपारी १ वाजता विवेकानंद कॅन्सर हॉस्पिटल, लातूर येथे रुग्ण व गरजूंना अन्नदान करून समाजसेवेची परंपरा कायम ठेवली. सायंकाळी श्री गुरु गणेश जीवराज जैन गोशाळा येथे गोमातांना चारा वाटप करण्यात आला. यावेळी संजय राजुळे यांनी आजपासून कधीही प्लास्टिक पिशवीचा वापर करणार नाही असा संकल्प केला. तसेच उपस्थित नागरिकांना प्लास्टिकमुक्त जीवन जगण्याची आणि पर्यावरण संरक्षणासाठी सक्रिय योगदान देण्याची शपथ देण्यात आली.

विशेष म्हणजे, वाढदिवसानिमित्त कोणताही अनावश्यक खर्च न करता, फटाके न उडवता, हॉटेलमधील पार्टी अथवा दिखाऊ कार्यक्रमांना फाटा देत संजय राजुळे यांनी समाजोपयोगी उपक्रमांना प्राधान्य दिले. गोमातेच्या सान्निध्यात वाढदिवस साजरा करून अन्नदान, गोसेवा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. वाढदिवस हा केवळ आनंदोत्सव नसून समाजाप्रती असलेली जबाबदारी जपण्याची संधी असल्याचे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले.

या कार्यक्रमास समाजकल्याण विभागाचे सहआयुक्त अविनाश देवशटवार, जिल्हा कृषी अधीक्षक राजेंद्र कदम, वैष्णवी इंडोस्कोपी सेंटरचे डॉ. राजेश दरडे, सामाजिक कार्यकर्ते तथा बिल्डर धर्मवीर भारती, लायन्स क्लब ऑफ लातूर सिटीचे अनिल झंवर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच सामाजिक कार्यकर्ते तथा संपादक गंगाधर डिगोळे, मुद्दा लाईव्हचे संपादक दत्तात्रय परळकर, लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघाचे अध्यक्ष रविकिरण सुर्यवंशी, जिल्हा बातमी संपादक राम रोडगे, त्रिंबकआप्पा माळेवाडे प्रतिष्ठानचे अध्यक्ष गुरुबस माळेवाडे, माधव तरगुडे, मनोज पटवारी, विरभद्र तरगडे, ओंकार कनकटे विविध क्षेत्रांतील मान्यवर, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. वृक्षारोपण, अन्नदान, गोसेवा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणार्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. समाजोपयोगी कार्यातून वाढदिवस साजरा करण्याचा संजय राजुळे यांचा उपक्रम अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला.

# पद्मभूषण पं. अजयजी चक्रवर्ती यांच्या गायनाने लातूरकर रसिक श्रोते मंत्रमुग्ध




**लातूर/प्रतिनिधी:** येथील श्री ज्ञानसरस्वती मंदिर संस्थान आणि सरस्वती संगीत महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गुरुवर्य स्वरतालयोगी पं. गोविंदराव बोरगांवकर यांच्या पुण्यस्मरणार्थ दिला जाणारा स्वरतालयोगी पं. गोविंदराव बोरगांवकर राष्ट्रीय स्मृती पुरस्कार जगतविख्यात गायक पद्मभूषण पं. अजयजी चक्रवर्ती यांना मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. एक लाख रुपये रोख रक्कम, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप होते. दयानंद सभागृह, लातूर याठिकाणी आयोजित या पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी मंत्री आ. दिलीपरावजी देशमुख साहेब यांनी भूषविले. याप्रसंगी मंचावर प्रमुख सन्माननीय अतिथी म्हणून

शिक्षक आमदार विक्रमजी काळे, डी.एस. ग्रुपचे संचालक श्री.तुकाराम पाटील, तालमणी डॉ. राम बोरगांवकर,पद्मभूषण पं. अजयजी चक्रवर्ती, सुरमणी पं. बाबुराव

बोरगांवकर, सौ. मधुवंती देशमुख बोरगांवकर - देशमुख हे मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस सौ. सरस्वती बोरगांवकर यांनी राग मधुवंतीमध्ये 'शाम भई घनश्याम' द्रुत चीज तयारिने सादर केली. त्यांना हार्मोनियम साथ सुरमणी पं.बाबुराव बोरगांवकर यांनी केली तर तबलसंगत अंबरीश शिलवंत यांनी केली.

याप्रसंगी विश्वविख्यात सुप्रसिद्ध गायक पं. अजयजी चक्रवर्ती यांनी सुरुवातीस राग - हंसध्वनी मध्ये 'तेरा भाग जागा मन लागा' या विलंबित बंदिशीने रागाची विणत मांडली व प्रत्येक स्वराची चढती आलापी करून लातूरकर रसिक श्रोत्यांना स्वरमुग्ध केले. संपूर्ण भारत देशामध्ये रागाचा सखोल अभ्यास व स्वरचिंतन त्यांच्या प्रतिभेला साजेसेनुसार जाणवत होते. त्यामुळे रसिक एकत्रित होऊन ब्रह्मानंदी विलीन झाले होते. पंडितजींची एक-एक स्वरात त्याची पुजा करीत गायन सादर करण्याची त्यांची अनोखी पद्धत सर्वांना भावून गेली.

पंडितजींनी यानंतर संत कबीर यांचे 'मोरा कहाँ ढूँढे ' हे अर्थपूर्ण भजन सादर करून श्रोत्यांना भक्तिसागरात डुंबविले . या स्वरमैफिलीची सांगता त्यांनी बडेगुलामअलीखाँ यांची प्रसिद्ध ठुमरी 'बाजुबंद खुल खुल जा' या करुणरसप्रधान ठुमरीने केली. त्यांना तबलासाथ श्री. स्वप्नील भिडे यांनी केली, हार्मोनियम साथ पं. अजय जोगळेकर यांनी तर तानपुरा साथ श्री. मेहेर परळीकर व सरस्वती बोरगावकर - शिलवंत यांनी केली. या कार्यक्रमास लातूरकर रसिकांची उत्स्फूर्त दाद मिळाली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक तालमणी डॉ.राम बोरगावकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.विश्वनाथ स्वामी यांनी मानले.

## शेतकरी पेरणी योग्य पावसाच्या प्रतीक्षेत

**लातूर/प्रतिनिधी:** : आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर रेणापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी खरीपपूर्व शेती मशागतीच्या कामांना वेग दिला असून पेरणीची तयारी जोरात सुरु केली आहे. दरम्यान पेरणी योग्य पावसाच्या प्रतीक्षेत शेतकरी सज्ज झाला आहे. शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असा कृषी विभागाचा सल्ला शेतकऱ्यांना देण्यात आला आहे. मे महिन्यात उन्हाची तीव्रता अधिक वाढली होती अशाही स्थितीत भर उन्हात शेतकऱ्यांनी शेतातील नांगरणी, वखरणी, बांध दुरुस्ती, झाडे-झुडपे काढणे व इतर कामे केली आहेत. मे च्या शेवटच्या आठवड्यात वातावरणात थोडासा बदल झाला त्यामुळे शेती कामाला वेग आला आहे थंड, महागामोलाची खते व बियाण्यांची जमवाजमव केली जात आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# रेणा साखर कारखान्याकडुन ऊसाला प्रति मे.टन रु. ३१६९.१५/- याप्रमाणे अंतीम ऊस बील पुरवठादारांच्या खात्यावर जमा

**रेणापूर/प्रतिनिधीः** राज्यात साखर कारखानदारीत नावलौकिक असलेल्या मांजरा परिवारातील एक अग्रगण्य घटक असलेल्या रेणा सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक तथा मांजरा परिवाराचे मार्गदर्शक सहकारमहर्षी मा.श्री. दिलीपरावजी देशमुख साहेब यांनी कारखान्याच्या मागील वर्षीच्या वार्षीक सर्वसाधारण सभेमध्ये जाहीर केल्याप्रमाणे रेणा कारखान्याच्या गळीत हंगाम २०२५-२६ चा ऊसदर ३१५०/- च्यावर राहील असे ग्वाही देण्यात आली होती.

त्यानुसार कारखान्याने गळीत हंगाम २०२५-२६ मध्ये सहकारमहर्षी मा.श्री. दिलीपरावजी देशमुख साहेब, मा.आ.श्री. अमितजी देशमुख साहेब व मा.श्री.धिरजजी देशमुख साहेब यांच्या पारदर्शक नियोजन व मार्गदर्शनामुळे कारखान्याचा गळीत हंगाम २०२५-२६ यशस्वीरित्या पार पाडला असुन गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये कारखान्याने अवघ्या ११९ दिवसात कार्यक्षमतेचा पुर्णपणे वापर करत ५६८०८८.७९० मे.टन ऊसाचे गाळप करुन सिरप टु इथेनॉल व बी हेवी मोलासेस व्हॅलीडेशनसह १२.२१५ टक्के साखर उतारा प्राप्त करत ५७८२०० क्विंटल साखर उत्पादीत केली आहे. यासोबत कारखान्याने कोजन प्रकल्पामधुन २९३३५९३२ युनिट उत्पादीत करुन स्ववापर वजा जाता १२०११८३५ युनिट एक्सपोर्ट केले असुन तसेच कारखान्याचे विस्तारीत डिस्टलरी प्रकल्पासह डिस्टलरी प्रकल्पामधुन आज अखेर १३०००००० ब.लि, ज्युस ते इथेनॉल, बी हेवी पासुन इथेनॉल व सी हेवी मोलासेस पासुन इथेनॉलचे उत्पादीत केले आहे.



**रेणाचा गळीत हंगाम २०२५-२६ करीता अंतीम ऊस दर प्रति मे.टन रु. ३१६९.१५/-**

कारखान्याने गळीत हंगाम २०२५-२६ मध्ये गाळपास आलेल्या ऊसाकरीता पहीली उचल २७५०/- देण्यात आली होती तद्नंतर कारखान्याने श्रध्देय विलासरावजी देशमुख साहेब यांच्या जयंतीचे औचित्य साधुन दुसरा हप्ता प्रति मे.टन रु. १००/- याप्रमाणे ऊसदर अदा करण्यात आला असुन शासन निर्णयानुसार उर्वरीत एफ.आर.पी नुसार होणारी रक्कम रु. ३१९.१५/- याप्रमाणे एकुण रक्कम रु. ३१६९.१५/- होत असुन संस्थापक मा.श्री. दिलीपरावजी देशमुख साहेब यांच्या सुचनेनुसार सद्या पेरणी हंगाम असल्याने शेतकऱ्यांचे हित व गरज पाहुन मांजरा परिवार शेतकऱ्यांच्या पाठीशी कायम खंबीर पणे उभा असल्याने शेतकऱ्यांना पेरणी व खताकरीता मदत व्हावी यासाठी कारखान्याचे गळीत हंगाम २०२५-२६ मध्ये गाळपास आलेल्या ऊसाकरीता प्रति मे.टन रु. ३१९.१५/- याप्रमाणे ऊसदर अदा करण्याच्या निर्णयानुसार कारखान्याने गळीत हंगाम २०२५-२६ मध्ये गाळपास आलेल्या ऊसास प्रति मे.टन रु. ३१९.१५/- याप्रमाणे ऊस बीलाची रक्कम संबधीत ऊस पुरवठादार शेतकरी यांचे खातेवर वर्ग करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांसोबत ठेकेदार व कर्मचारी यांनाही सहकारमहर्षी मा.श्री. दिलीपरावजी देशमुख साहेब यांनी तोडणी व वाहतुक यंत्रणेचे ५०टक्के डिपॉजीट अदा केले असुन कर्मचारी यांचेकरीता त्रिपक्षीय करारानुसार कारखान्यातील अधिकारी व कर्मचारी यांना १० टक्के पगारवाढीचा निर्णय घेतला असुन त्यांची अंमलबजावणी केली आहे. शेतकऱ्यांची ऊस बीले, तोडणी व वाहतुक यंत्रणेचे बीले व डिपॉजीट रक्कम तसेच कर्मचारी यांच्या मासीक पगार वेळेत व पगारवाढ झाल्यामूळे कारखान्यात शेतकरी, तोडणी व वाहतुक ठेकेदार यांच्यासह कर्मचारी यांचे आर्थिक नियोजनास नक्कीच मदत होणार असुन यांचे श्रेय कारखान्याचे संस्थापक सहकारमहर्षी मा.श्री. दिलीपरावजी देशमुख साहेब यांचे आहे.

- **रेणाचा गळीत हंगाम २०२५-२६ चा अंतीम ऊसदर रु. ३१६९.१५/- प्रति मे.टन.**
- **पेरणीपुर्वी रु. ३१९.१५/- चा हप्ता आल्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी आनंदात**
- **१० टक्के पगारवाढीमुळे कर्मचारी ही आनंदी.**

**ऊस बिल उचल करण्याचे आवाहन**

ज्या ऊस उत्पादकांचा ऊस गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये कारखान्यास गाळपास आलेला आहे त्यांनी प्रति मे.टन रु. ३१९.१५/- याप्रमाणे आपल्या बँक शाखेतून ऊस बिलाची रक्कम उचल करावी असे आवाहन रेणा साखर कारखान्याचे चेअरमन अनंतराव ठाकूर देशमुख,, व्हाइस चेअरमन ॲड. प्रवीण पाटील, सन्माननीय संचालक मंडळ व कार्यकारी संचालक बी.व्ही.मोरे यांनी केले आहे.

# आष्टामोड - उदगीर रस्त्यावर सिमेंट रस्त्याला भेगा, अपघात वाढले

**नळेगाव/ अजगर मजकुरी :** सिमेंट रस्त्याला मोठ्या प्रमाणात भेगा पडल्या आहेत. या भेगामुळे अपघात होऊन यामध्ये अनेकांना जीव गमवावा लागला आहे.

भेगा आता वाहनचालकांच्या जीवावर बेतू लागल्या आहेत. आष्टामोड - उदगीर राज्यमार्गावरील धोकादायक स्थितीमुळे आपघाताचे प्रमाण वाढले आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या निष्काळजी कारभारावर संताप व्यक्त होत आहे.

आष्टामोड - उदगीर रस्त्यावर नळेगाव जवळ रस्त्याला भेगा पडून सिमेंट रस्ता खचला आहे. याठिकाणी दररोज अपघात घडत आहेत. यामध्ये अनेकांना गंभीर दुखापत झाली आहे.या मार्गावर धोक्याचे वळण आहेत. अजनसोंडा (ता. चाकूर ) येथील वळण रस्त्यावर अपघातात अनेकांना जीव गमवावा लागला आहे.

या मार्गावर कुठेच दिशादर्शक फलक नाहीत.या मार्गावर यापूर्वीही अनेक किरकोळ व गंभीर अपघात घडले असून,नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही संबंधित यंत्रणेकडून प्रभावी उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे हा मार्ग हळूहळू 'मृत्यूचा मार्ग' ठरत असल्याची भावना परिसरात व्यक्त होत आहे.


या रस्त्यावरील भेगा बुजवण्यात यावे, चेतावणी फलक लावावेत आणि संपूर्ण आष्टामोड - उदगीर मार्गाची सुरक्षा तपासणी करावी, अशी जोरदार मागणी केली आहे. आणखी जीवितहानी होण्यापूर्वी प्रशासनाने जागे होऊन ठोस उपाययोजना कराव्यात, अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशाराही स्थानिकांकडून देण्यात येत आहे.

**उन्हाळ्यात वाढल्या खाचा**

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, उन्हाळ्याच्या तीव्र उष्णतेमुळे आष्टामोड - उदगीर या मार्गावर मोठ्या प्रमाणात तडे गेले आहेत. परिणामी रस्त्यावर खोल खाचा निर्माण झाल्या असून, विशेषतः दुचाकीस्वारांची चाके या खाचांमध्ये अडकत आहेत. अचानक धक्का बसल्याने वाहनचालकांचे संतुलन बिघडून अपघात घडत आहेत.

**अपघातांची मालिका सुरूच**

आष्टामोड - उदगीर राज्यमार्गावरील ठिकठिकाणी पडलेले तडे, आणि खोल गेलेले जॉइंट यामुळे वाहनधारकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी या खाचा सहज लक्षात न आल्याने अपघाताचा धोका अधिक वाढतो. दररोज हजारो वाहने या मार्गावरून प्रवास करीत असताना सुरक्षेच्या मूलभूत बाबीकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.



**निकृष्ट दर्जाचे बांधकाम**

काम पूर्ण झाल्यानंतर कंत्राटदाराकडून देखभाल व दुरुस्तीची हमी देण्यात आलेली आहे. रस्त्यावरील तडे वाढत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. निकृष्ट दर्जाचे साहित्य, बांधकामातील त्रुटी किंवा गुणवत्तेच्या नियंत्रणातील दुर्लक्ष यामुळे हा प्रकार घडला का, याची चौकशी होणे आवश्यक आहे. सिमेंट रस्ता इतक्या कमी कालावधीत खराब होत असेल तर कमी खर्चीक आणि सहज दुरुस्त होणारा डांबरी रस्ता अधिक उपयुक्त ठरला असता. आष्टामोड- नळेगाव - उदगीर सिमेंट रस्त्यावरील भेगांच्या पार्श्वभूमीवर या कामाची स्वतंत्र तांत्रिक तपासणी करून कारवाई करण्यात यावी, तसेच कंत्राटदाराकडून दुरुस्ती करून घेण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

संबंधित रस्त्याच्या अभियंत्यांना भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता प्रतिसाद देत नाहीत व भ्रमणध्वनी बंद येत त्यांचा संपर्क होऊ शकला नाही.

**प्रतिक्रिया**

रस्ते चांगले झाल्यामुळे वाहनाचा वेग वाढला आहे. अनेक वाहनचालक नियमांचे पालन करत नाहीत. सिमेंट रस्त्याला अनेक ठिकाणी भेगा पडल्या आहेत. यामुळे मोटारसायकलचे अपघात होत आहेत. अनेकांना जीवही गमवावा लागला आहे.संबंधित विभागाने याकडे लक्ष देऊन सिमेंट रस्त्याच्या भेगा दुरुस्त करावे. अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येणार आहे.

**- संभाजी घोणे**

# सोनार समाज संस्था, सोलापूर ला इंडियन एक्सलन्स अवॉर्ड २०२६ जाहीर

## अध्यक्ष वसंत पोतदार यांच्या नेतृत्वातील कार्याची राष्ट्रीय

**सोलापूर/प्रतिनिधीः** महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक अहिल्याराज वृत्तपत्राच्या वर्धापन दिनानिमित्त दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठित इंडियन एक्सलन्स अवॉर्ड २०२६ साठी सोनार समाज संस्था, सोलापूर या सामाजिक संस्थेची निवड करण्यात आली आहे. सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल संस्थेला हा राष्ट्रीय सन्मान जाहीर झाला आहे.

संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. वसंत पोतदार, उपाध्यक्ष श्री. विजयकुमार पोतदार व सचिव श्री. दत्तगुरु वेदपाठक यांच्या नेतृत्वाखाली संस्था गेली अनेक वर्षे समाजसेवेचे व्रत पाळत आहे. संस्थेचे अग्रणी प्रवर्तक सर्वश्री मोहनराव मंद्रूपकर, संजयजी मैदर्गीकर, सह सचिव गिरीश जमखंडीकर, खजिनदार गजानन सोनार, संचालक इंजिनिअर विजयकुमार पोतदार, इंजिनियर रुद्रप्पा दोडमनी, प्रा. डॉ. अमर दीक्षित सर, सौ. चित्रा पोतदार यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आणि सहकार्याने संस्थेचे कामकाज सुरु आहे.

सोनार समाज संस्था ही नोंदणीकृत व पारदर्शक संस्था असून, केंद्र शासन, नीती आयोगाची DARPAN ID प्राप्त केलेली आहे. त्यामुळे संस्था CSR निधीसाठी देखील पात्र ठरली आहे.

संस्थेमार्फत दरवर्षी राज्यस्तरीय मोफत वधू-वर मेळाव्याचे आयोजन करण्यात येते. यासोबतच कर्तृत्ववान समाज बांधवांचा गुणगौरव करून त्यांना सन्मानित केले जाते. गेल्या वर्षी वधू-वर मेळाव्यास अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यामुळे, समाज बांधवांपर्यंत शासकीय योजनांची माहिती पोहोचावी यासाठी विशेष उपक्रम राबवण्यात आला.

श्री. संत नरहरी आर्थिक विकास महामंडळ, विश्वकर्मा कौशल्य विकास योजना, पंतप्रधान, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम - उच्, झच.एत्रऋध आदी योजनांची सविस्तर माहिती संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांमार्फत समाज बांधवांना देण्यात आली. असा उपक्रम राज्यात इतरत्र कोठेही राबविला नसल्यामुळे उपस्थित बांधवांनी संस्थेच्या या उपक्रमाचे विशेष कौतुक केले व गौरवोद्गार काढले.

संस्थेच्या या सर्व समाजोपयोगी उपक्रमांची दखल घेऊन दैनिक अहिल्याराज ने इंडियन एक्सलन्स अवॉर्ड २०२६ हा प्रतिष्ठित राष्ट्रीय पुरस्कार जाहीर केला आहे.

संस्थेसमोरील सध्या एकमेव अडचण जागेची आहे. समाजासाठी विविध उपक्रम राबवण्यासाठी स्वतःची जागा असणे आवश्यक आहे. त्यासाठी संस्थेने समाजातील दानशूर व्यक्ती व उद्योजकांकडे मदतीचा हात मागितला आहे.

या पुरस्काराबद्दल अध्यक्ष वसंत पोतदार म्हणाले, अहिल्याराज सारख्या अग्रगण्य वृत्तपत्राने आमच्या कार्याची दखल घेतली, हा आमच्यासाठी मोठा सन्मान आहे. यापुढेही 'शिक्षण। सहकार। प्रगती।' या ब्रीदवाक्याने समाजाच्या उन्नतीसाठी आमचे कार्य अविरत सुरू राहील.

# पतीसह पाच जणांवर गुन्हा दाखल

**उदगीर/प्रतिनिधी :** विवाहितेकडे वारंवार पैशांची मागणी करून, मालमत्ता नावावर करून देण्याचा दबाव टाकत शिवीगाळ करुन मारहाण व मानसिक छळ केल्याप्रकरणी उदगीर ग्रामीण पोलिस ठाण्यात गुरुवारी रात्री पतीसह पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी सांगितले, फिर्यादी निकिता अरविंद क्यादरकुंटे यांचा पती अरविंद क्यादरकुंटे, सासू गंगाबाई क्यादरकुंटे, सासरे माधवराव क्यादरकुंटे, दीर किशन क्यादरकुंटे व श्रीनिवास क्यादरकुंटे (सर्वजण रा. वळंकी, ता. मुखेड) यांनी २०२१ ते ५ मे २०२३ दरम्यान संगनमत करून फिर्यादीच्या वडिलाची मालमत्ता नावावर करून देण्यासाठी मारहाण केली. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली.

## शहरात...

प्रगती प्रगति म्हणत
शहरे घुसली गावात
जमिनीचे अधिग्रहण
मिळेलं तशा भावात

नोकरीरोजगार शोधे
ग्रामस्थ घुसे शहरात
मिसळ भेसळ किती
रे स्थानांतरणजोरात

रहायला नाही जागा
जंगले तोडत घावात
बिल्डर्स राज कारणी
सामिल अशा डावात

तीसाव्यामजल्याराहे
पत्ता सांगतोय गर्वात
स्टेटसची उंची वाढते
अंहकार भारी सर्वात

शेती वाडी विकलेली
बोन्साय लावा घरात
गाय बैल नकोसे वाटे
कुत्रेस्वागतास दारात

जगे अग्दी आरामात
सगळेसेटल्ड शहरांत
आठवे गाव कधीतरी
कळसलते का ऊरात

**-हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# जागृती शुगर कडून ३१६२.१६ रुपयांचा अंतिम भाव

## शेतकऱ्यांच्या खात्यावर ३१२.१६ रुपये प्रमाने उर्वरित रक्कम जमा

**लातूर/प्रतिनिधीः** राज्यातील खाजगी साखर उद्योगात मराठवाडा आणि विदर्भ राज्यात ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एफ आर पी पेक्षा अधिक भाव देणाऱ्या देवणी तालुक्यातील जागृति शुगर अँड अलाईंड इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्याकडून २०२५-२०२६ मध्ये गाळपास आलेल्या ऊसासाठी एफ आर पी च्या अंतिम हप्त्यापोटी प्रती मेट्रिक टन ३१२.१६रुपये ऊसाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर गुरुवारी ११ जून रोजी वर्ग करण्यात आली असून त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे दरम्यान दरवर्षी प्रमाणे याही वर्षी जागृती शुगर ने शेतकऱ्यांना अधिक भाव देण्याची परंपरा कायम राखली आहे त्याबद्दल कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री आदरणीय दिलीपराव देशमुख कारखान्याच्या चेअरमन तथा कार्यकारी संचालक सौ गौरवी अतुलजी भोसले (देशमुख) यांचे उस उत्पादक शेतकरी यांचेकडून कौतुक होत आहे .



**६ लाख ६४ हजार मेट्रिक टन ऊसाचे विक्रमी गाळप**

राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी तथा कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याच्या अध्यक्षा सौ गौरवी अतुलबाबा भोसले यांच्या नेतृत्त्वाखाली कारखान्याने २०२५-२६ गाळप हंगामात कारखान्याने ६ लाख ६४ हजार ८ मेट्रिक टन ऊस गाळप करून ६ लाख ९० हजार ५००क्विंटल साखरेचे उत्पादन केले आहे बी हेविसह सरासरी साखर उतारा १२.००४टक्के मिळालेला असून कारखान्याने आजपर्यंत२ कोटी ५२ हजार युनिट वीज निर्यात केली असून आघाडी घेतली आहे राज्य शासनाच्या १५ एप्रिल २०२५ च्या शासन निर्णयानुसार मागील हंगामाचा अंतिम साखर उतारा आणि ऊसतोड वाहतूक खर्च विचारात घेऊन एफआरपी निश्चित करण्यात आली असून त्यानुसार जागृति शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेड चा अंतीम भाव ३१६२.१६ रूपये प्रति मेट्रिक टन निश्चित केला आहे यापूर्वी कारखान्याकडून ऊस उत्पादक पुरवठा शेतकऱ्यांना २८५० रुपये प्रति मेट्रिक टन दराप्रमाणे ऊस बिल अदा केले आहेत उर्वरीत ३१२.१६ रूपये प्रति मेट्रिक टन ऊसाची रक्कम ११ जून रोजी खात्यावर जमा देण्यात आले असून संबधित ऊस पुरवठा शेतकऱ्यांनी नजीकच्या बँक खात्यावरील बिलाची रक्कम घ्यावी असे आवाहन जागृती शुगर चे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे ,सरव्यवस्थापक गणेश येवले यांनी केले आहे.

# जाहीर प्रगटन

दिनांक : १२.०६.२०२६

जाहीर प्रगटनानुसार नागरीकांना कळविण्यात येते की, खालील यादीप्रमाणे लातूर महानगरपालिका, लातूर प्लॉट घेणा-यांनी नामांतरासाठी अर्ज दाखल केले आहे. तरी सदरील नामांतराबाबत नागरीकांना सुचना किंवा हरकती आहेत त्यांना हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसाचे आत लातूर महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे लेखी स्वरूपात नाहरकत दाखल कराव्यात जर कोणतेही हरकती आल्या नाही तर नामांतर मंजुर करून त्याप्रमाणे नाव लावण्याचे कार्यवाही करण्यात येईल.

**सिरीयल क्रमांक 176-190**

| अ.क्र | जागा विक्री करणाऱ्याचे नाव | जागा खरेदी करणाऱ्याचे नाव | सर्वे नंबर | घर क्रमांक | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|---|
| 1 | दीपक वैजनाथ कलवले | विश्रांती संदीप सोळुंके व इतर | 58 | A5-5706-2 | 74.34 चौ.मी. |
| 2 | रशिदाबी इमाम शेख | विजयकुमार प्रभाकर कदम | 77/3/K | A1-154-1 | 41.82 चौ.मी. |
| 3 | शेख एजाज वजीर मोहम्मद | शाहीन वझीर शेख | 10291 | A5-3418-1 | 121.28 चौ.मी. |
| 4 | सय्यद करीम सलीम | इक्बाल वजीरसाब शेख | 242/B | A5-3418 | 144.91 चौ.मी. |
| 5 | नानासाहेब मारुती बिराजदार | सुरेखा नानासाहेब बिराजदार व इतर | 39 | A2-1273 | - |
| 6 | कन्हैयालाल हेमराज पुरोहित | कोलिन कन्हैयालाल पुरोहित | - | A1-996 | 331.20 चौ.मी. |
| 7 | खलील फतरूमिया सय्यद | आसिफ खलील सय्यद | 237/अ/1 | A5-3599 | 780 चौ.फु. |
| 8 | प्रवीणकुमार मनजी राठोड | अमित हिरालाल लोया व इतर | 48 | A4-4290-3-1 | 541.72 चौ.मी. |
| 9 | रामेश्वर महादेव फड | प्रियंका सुधीर काळे | 59 | A5-5775-2-1 | 97.58 चौ.मी. |
| 10 | सूर्यभान नागू भांडेकर | मीनाबाई सुरेश मिरजे व इतर | 57 | A1-4808-1 | 340 चौ.फु. |
| 11 | संजयकुमार शिवाजीराव सूर्यवंशी | मेघराज शिवाजीराव सूर्यवंशी | 73/1 | A1-727 | 215 चौ.मी. |
| 12 | मेघराज शिवाजीराव सूर्यवंशी | संजयकुमार शिवाजीराव सूर्यवंशी | 73/1 | A1-727-1 | 53 चौ.मी. |
| 13 | मेघराज शिवाजीराव सूर्यवंशी | संजयकुमार शिवाजीराव सूर्यवंशी | 73/1 | A1-727-2 | 53 चौ.मी. |
| 14 | मेघराज शिवाजीराव सूर्यवंशी | संजयकुमार शिवाजीराव सूर्यवंशी | 73/1 | A1-727-3 | 53 चौ.मी. |
| 15 | मेघराज शिवाजीराव सूर्यवंशी | संजयकुमार शिवाजीराव सूर्यवंशी | 73/1 | A1-727-4 | 53 चौ.मी. |

स्वाक्षरित/-
**क्षेत्रीय अधिकारी**
**क्षेत्रीय कार्यालय A**
**लातूर शहर महानगरपालिका, लातूर**

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६